cmyk

## संपादकीय

### एल-निनोचा वाढता प्रभाव; शेती आणि अर्थव्यवस्थेवर संकट

भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि देशाच्या जलव्यवस्थेचा कणा मानला जाणारा मान्सून यंदा नव्या संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. एका बाजूला मान्सून वेळेपूर्वी केरळ किनारपट्टीवर दाखल होण्याचे सकारात्मक संकेत मिळत असताना, दुसऱ्या बाजूला 'सुपर एल-निनो'च्या वाढत्या प्रभावामुळे संपूर्ण हंगामावर अनिश्चिततेचे गडद ढग दाटू लागले आहेत. हवामानशास्त्रातील हा विरोधाभास केवळ वैज्ञानिक चर्चेचा विषय राहिलेला नसून तो थेट अन्नसुरक्षा, पाणीटंचाई आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडला गेला आहे.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-५९ | मंगळवार दि.१९ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# एल निनो मुळे खरीप पीक उत्पादन घटणार!

## आयसीएआरच्या अभ्यासातून चिंता व्यक्त

दिल्ली । वृत्तसंस्था

**आगामी खरीप हंगामावर एल निनोचे सावट आहे. कारण याच्या प्रभावामुळे जून ते सप्टेंबर या कालावधीतील मॉन्सून हंगामात कमी पावसाची शक्यता आहे. परिणामी, प्रमुख खरीप पिकांच्या उत्पादनात घट होऊ शकते, अशी चिंता एका अभ्यासातून व्यक्त करण्यात आली आहे.**

भारतीय कृषी संशोधन परिषद अर्थात आयसीएआर संस्थेच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की, ज्यावेळी भारतावर एल निनोचे संकट आले; त्यावेळी अनेक राज्यांमधील प्रमुख



खरीप पिकांच्या उत्पादनात मोठी घट दिसून आली. आयसीएआर-इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मिंग सिस्टीम्स रिसर्चचे सुभाष एन पिल्लई यांच्या नेतृत्वाखालील यावर संशोधन करण्यात आले. त्यात एल निनोच्या वर्षांमध्ये ७७ जिल्ह्यांतील धान उत्पादनात सुमारे १० टक्के घट झाली, तर ६५ जिल्ह्यांतील मका उत्पादनातही घट झाल्याचे आढळून आले. याचा सर्वाधिक फटका आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश३, झारखंड आणि ओडिशा यांसारख्या प्रमुख धान उत्पादक राज्यांना बसला. अशा प्रतिकूल हवामानाबाबतच्या घटनांच्या काळात ज्वारी आणि बाजरी पीक उत्पादनात देशातील प्रत्येकी ३६ जिल्ह्यांत १० टक्क्यांपेक्षा अधिक घट दिसून झाली. यावरून पावसावर अवलंबून असलेल्या शेतीची असुरक्षितता अधोरेखित होते, असेही अभ्यासातून निष्पन्न झाले आहे. एल निनोमुळे मध्य आणि पूर्व उष्णकटिबंधीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढते. याचा परिणाम मॉन्सूनवर होऊन भारतात पावसाचे प्रमाण कमी राहते. यामुळे शेती क्षेत्राचे मोठे नुकसान होते. २०२३ मध्ये एल्सेव्हियर द्वारे क्लायमेट सर्व्हिसेस या जर्नलमध्ये एक अभ्यास ▶▶ पान २ वर

# शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची सीबीआय कोठडी

## मुख्य सूत्रधाराच्या संपर्कात असल्याचा दावा

नवी दिल्ली । वृतसंस्था

प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी अटक झालेल्या शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. मोटेगावकरने प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांमध्ये फिरवली, असा दावा सीबीआयने कोर्टात केला आहे.

प्रश्नपत्रिका फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ३ मे रोजी देशभर एकाच वेळी घेण्यात आलेली वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट- यूजी २०२६ परीक्षा रद्द करण्यात आली होती. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या २२.७० लाख विद्यार्थ्यांना या



निर्णयाचा फटका बसला असून, या प्रकरणी सीबीआयने देशभरात विविध ठिकाणी कारवाईचा धडाका लावला आहे. रविवारी सीबीआयने आरसीसी या नामांकित ▶▶ पान २ वर

### शिवराज मोटेगावकर आरोपी प्रल्हाद कुलकर्णींच्या संपर्कात

पेपरफुटीप्रकरणातील आरोपी प्रल्हाद कुलकर्णी हा मोटेगावकर याच्या संपर्कात होता. कुलकर्णी केमेस्ट्री पेपर सेट करायचा आणि मोटेगावकरचेही केमेस्ट्री क्लास आहेत, याकडेही सीबीआयने कोर्टाचे लक्ष वेधले. प्रल्हाद कुलकर्णी हा पुण्यातील शिक्षणक्षेत्रात पी. व्ही. कुलकर्णी म्हणून परिचित आहे. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा प्राध्यापक होता. कुलकर्णीने मनीषा वाघमारेच्या मदतीने काही विद्यार्थ्यांना स्वत:च्या निवासस्थानी बोलवून घेतले. या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेतील प्रश्न, अचूक पर्याय सांगण्यात आले होते. मोटेगावकर हा प्रल्हाद कुलकर्णींच्या संपर्कात होता, असे तपासात समोर आले होते. इतकंच नव्हे, प्रल्हाद हा लातूरच्या महाविद्यालयातून निवृत्त झाल्यावर मोटेगावकरच्या कोचिंग सेंटरमध्ये शिकवत होता, असा दावाही केला जातो आहे. प्रल्हाद हा राष्ट्रीय परीक्षा संस्था म्हणजेच एनटीएच्या परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने रसायनशास्त्राची प्रश्नपत्रिका त्याच्यापर्यंत पोहोचू शकली.

### परीक्षेच्या १० दिवस आधीच नीटचा पेपर हातात

शिवराज मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये थेट नीट परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिकाच आढळून आली आहे. छापा टाकून मोबाईल, लॅपटॉप, आयपॅड आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे सीबीआयने जप्त केली होती. या उपकरणांची कसून तपासणी केली असता, प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या वैयक्तिक मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेची लीक झालेली मूळ प्रश्नपत्रिका आढळून आली. सीबीआयच्या दाव्यानुसार, मोटेगावकर हे पेपर लीक करणाऱ्या एका मोठ्या संघटित टोळीचे सक्रिय सदस्य आहेत. ३ मे रोजी परीक्षा होण्याच्या तब्बल १० दिवस आधी, म्हणजेच २३ एप्रिल २०२६ रोजीच त्यांच्याकडे नीट परीक्षेचे प्रश्न आणि उत्तरे पोहोचली होती. मोटेगावकर यांनी ही प्रश्नपत्रिका अनेक मध्यस्थांना, पालकांना आणि विशिष्ट लाभार्थी विद्यार्थ्यांना पुरवली होती. यासाठी मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा संशय आहे.

# एसटीचा प्रवास महागणार

## परिवहन मंत्र्यांनी दिले संकेत!



मुंबई । प्रतिनिधी

**इंधन दरवाढीमुळे एसटी तिकीट दरात वाढ करण्याचे संकेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्याने लालपरीचा प्रवास महागणार आहे. एसटी महामंडळाला डिझेलसाठी विशेष सवलत दिली तर वाढ होणार नाही, मात्र विशेष सवलत न मिळाल्यास दरवाढ करावी लागेल, असे मंत्री सरनाईक यांनी सोमवारी (दि. १८) स्पष्ट केले.**

मंत्री सरनाईक यांनी माध्यमाशी बोलताना सांगितले की, एसटीला १० लाख ८७ हजार लिटर डिझेल लागते. हा पुरवठा इंडियन ऑईलकडून होत असतो. मागील आठवड्यात डिझेलच्या दरात ३ रुपये वाढ केली आहे. या दरवाढीमुळे ३३ लाख ७० हजार जास्त मोजावे लागत आहेत. महामंडळाला यामुळे वर्षाला १२४ कोटींचा तोटा होणार आहे. जागतिक पातळीवर युद्धाचा भडका उडाल्यास आणखी परिणाम होईल. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेनची पहिली झलक समोर

दिल्लीः अहमदाबाद - मुंबई दरम्यान धावणाऱ्या, भारताच्या प्रस्तावित बुलेट ट्रेनचा पहिला लूक नवी दिल्ली येथील रेल्वे मंत्रालयात प्रदर्शित करण्यात आला आहे. यातून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची एक झलक पाहायला मिळते. देशात सर्वाधिक चर्चेत असलेला रेल्वे प्रोजेक्ट म्हणजे, मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन. मोदी सरकारचा हा अतिशय महत्वकांक्षी प्रोजेक्ट आहे. जपानच्या सहकार्यातून भारतातील हा बुलेट ट्रेन प्रकल्प सुरु आहे. आता रेल्वे मंत्रालयाने या ट्रेनचे पहिले छायाचित्र प्रदर्शित करत बुलेट ट्रेन लवकरच सुरु होणार असल्याचे संकेत दिले आहेत. रेल्वे मंत्रालयाच्या इमारतीमधील गेट क्रमांक ४ येथे या हाय-स्पीड ट्रेनचे एक छायाचित्र लावण्यात आले आहे. या छायाचित्रातून बूलेटट्रेनच्या रचनेचा अंदाज येतो. या ट्रेनसाठी जपानच्या जगप्रसिद्ध शिनकानसेन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

### तीर्थक्षेत्राचे काम कालमर्यादेत पूर्ण करा

मुंबईः राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली. सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### पाकिस्तानकडून ८ हजार सैनिक आणि लढाऊ विमान

कराची : पाकिस्तानने सौदी अरेबियामध्ये परस्पर संरक्षण कराराअंतर्गत ८,००० सैनिक, लढाऊ विमानांची एक तुकडी आणि हवाई संरक्षण प्रणाली तैनात केली आहे, अशी माहिती पाकिस्तानमधील वरिष्ठ लष्करी सूत्रांनी सोमवारी रॉयटर्सला दिली. अमेरिका-इराण युद्धात मुख्य मध्यस्थ म्हणून काम करत असताना इस्लामाबाद रियाधसोबत लष्करी सहकार्य वाढवत आहे. या तैनातीला तीन सुरक्षा अधिकारी आणि दोन सरकारी सूत्रांनी दुजोरा दिला आहे. या सर्वांनी याचे वर्णन एक महत्त्वपूर्ण, लढाऊ-सक्षम सैन्यदल असे केले आहे, जे सौदी अरेबियावर पुन्हा हल्ला झाल्यास त्यांच्या लष्कराला पाठिंबा देण्यासाठी आहे. पाकिस्तानचे लष्कर आणि परराष्ट्र कार्यालय तसेच सौदी अरेबियाच्या सरकारी माध्यम कार्यालयाने या तैनातीवर प्रतिक्रिया देण्याच्या विनंतीला प्रतिसाद दिला नाही.

# नेकनूरमध्ये हिंदू जन आक्रोश मोर्चाला तुफान गर्दी

*** जात, पात, पक्ष बाजूला ठेवून हिंदू म्हणून एकत्र या**

*** आ.लांडगे, आ. संग्राम जगताप यांचे आवाहन**



नेकनूर । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपूर्वी एका रिक्षाला गाडीचा धक्का लागला आणि त्यातून रिक्षा चालकासह त्याची बहीण व भाचीला झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ व मेन रोड आणि कळसंबर रोडवरील केलेल्या अतिक्रमणामुळे सततचे होणारे भांडण आणि मारहाण यासाठी रस्त्यावरील अतिक्रमण काढून खेडेगावातील हिंदू लोकांवरील अन्याय कमी व्हावेत म्हणून नेकनूर मध्ये हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नेकनूर व परिसरातील हजारो लोकांनी यामध्ये सहभाग नोंदवल्याचे पहायला मिळाले.

या मोर्चासाठी आमदार महेश लांडगे, आमदार संग्राम जगताप व बंकट स्वामी संस्थानचे मठाधिपती हभप लक्ष्मण महाराज मेंगडे उपस्थित होते. यावेळी आमदार महेश लांडगे यांनी संबोधित करताना, सर्व हिंदूंनी आपली जात, पात व पक्ष बाजूला ठेवून एकत्र येण्याची गरज असल्याचे सांगितले. जोपर्यंत तुम्ही एकत्र येणार नाहीत तोपर्यंत हिंदूवरील अत्याचार कमी होणार ▶▶ पान २ वर

# पालघर जिल्ह्यात भीषण अपघात

## कंटेनरच्या-टेम्पोच्या धडकेत १२ जणांचा मृत्यू

पालघर । प्रतिनिधी

पालघर जिल्ह्यात मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या ट्रकची कंटेनरला जोरदार धडक बसल्याने झालेल्या या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर २० ते २५ जण गंभीर जखमी झाले असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पालघर जिल्ह्यातील धानीवरी गावाजवळ सोमवारी दुपारी ४ वाजता कंटेनर आणि टेंम्पोची धडक होऊन हा अपघात झाला. टेम्पो चुकीच्या बाजुने जात असल्याने हा अपघात झाल्याचें सांगण्यात येत आहे. वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या ट्रकमध्ये १०० हून अधिक लोक प्रवास करत होते. अपघात इतका भीषण ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.१८ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ३२०.०० क्विंटल** | | |
| २,२२० | २,५२५ | २,३३८ |
| **ज्वारी/हायब्रिड :८५.५० क्विंटल** | | |
| १,६५० | ४,३०० | २,५४५ |
| **मका/लोकल: ११४.५० क्विंटल** | | |
| १,७९२ | १,९०० | १,८५२ |
| **तूर : १७.०० क्विंटल** | | |
| ६,८०० | ७,४०० | ७,१९२ |
| **उडीद : ३.५० क्विंटल** | | |
| ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| **बाजरी: ८०.०० क्विंटल** | | |
| २,१५० | २,५६८ | २,२८१ |
| **मुग: २.०० क्विंटल** | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| **सोयाबीन: २०.०० क्विंटल** | | |
| ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| **हरभरा: ५.०० क्विंटल** | | |
| ४,४०१ | ५,२५१ | ४,८२६ |

# राज्यात पुन्हा निवडणुकिचा धुरळा

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठी १८ जूनला मतदान



मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. पावसाळी अधिवेशनापूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेतील रिक्त जागा भरण्याच्या हालचालींना वेग आला असून, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ जागांसाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून २२ जूनला मतमोजणी पार पडणार आहे.**

गेल्या काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने या मतदारसंघांतील अनेक जागा रिक्त होत्या. संबंधित आमदारांचा कार्यकाळ संपूनही नव्या निवडणुका घेता आल्या नव्हत्या. त्यामुळे तब्बल दोन ते अडीच वर्षांपासून विधान परिषदेतील काही जागा रिक्तच राहिल्या होत्या. आता या निवडणुकांमुळे त्या जागा भरल्या जाणार आहेत. महाराष्ट्र विधान परिषदेतील एकूण ७८ सदस्यांपैकी २२ सदस्यांची निवड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून केली जाते. मात्र, निवडणूक घेण्यासाठी संबंधित मतदारसंघात ▶▶ पान २ वर

### या भागांत होणार निवडणुका

राज्यातील अनेक महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमध्ये या निवडणुका होणार आहेत. यामध्ये पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, सोलापूर, जळगाव, नांदेड, अमरावती, सांगली-सातारा, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, भंडारा-गोंदिया, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि इतर काही मतदारसंघांचा समावेश आहे.

# रुपाली चाकणकरांना ईडीकडून समन्स, लवकरच होणार चौकशी



मुंबई । प्रतिनिधी

**भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर यांना समन्स बजावले आहेत. त्यांना याच आठवड्यात चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे.**

दोन दिवसांपूर्वीच विशेष तपास पथकाने या प्रकरणात काही महत्त्वाच्या व्यक्तींची चौकशी केली होती. त्यानंतर आता ईडीच्या एन्ट्रीमुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. अशोक खरात याच्याशी संबंधित आर्थिक व्यवहार, कथित मनी लॉन्ड्रिंग, देणग्या आणि काही संशयास्पद मालमत्ता व्यवहारांची चौकशी ईडीकडून केली जात आहे. या तपासादरम्यान काही आर्थिक व्यवहारांबाबत माहिती समोर आल्यानंतर रुपाली चाकणकर यांना समन्स बजावण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वी राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत विशेष तपास पथकाची स्थापना केली होती. या एसआयटीकडून मागील काही दिवसांत अनेक व्यक्तींची चौकशी करण्यात आली असून काही आर्थिक कागदपत्रे आणि डिजिटल पुरावेही तपासासाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. एसआयटी चौकशी सुरू असतानाच ईडीने स्वतंत्रपणे मनी लॉन्ड्रिंग अँगलने तपास सुरू ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# एल-निनोचा वाढता प्रभाव; शेती आणि अर्थव्यवस्थेवर संकट

भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि देशाच्या जलव्यवस्थेचा कणा मानला जाणारा मान्सून यंदा नव्या संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. एका बाजूला मान्सून वेळेपूर्वी केरळ किनारपट्टीवर दाखल होण्याचे सकारात्मक संकेत मिळत असताना, दुसऱ्या बाजूला 'सुपर एल-निनो'च्या वाढत्या प्रभावामुळे संपूर्ण हंगामावर अनिश्चिततेचे गडद ढग दाटू लागले आहेत. हवामानशास्त्रातील हा विरोधाभास केवळ वैज्ञानिक चर्चेचा विषय राहिलेला नसून तो थेट अन्नसुरक्षा, पाणीटंचाई आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडला गेला आहे.

अमेरिकेच्या 'नोआ' संस्थेने सुपर एल-निनो सक्रिय होण्याची शक्यता ८२ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे स्पष्ट केले आहे. गेल्या महिन्यात ही शक्यता ६१ टक्के होती. प्रशांत महासागरातील तापमानात वाढ होत असल्याने जागतिक हवामानचक्रावर त्याचा परिणाम होणार हे जवळपास निश्चित झाले आहे. भारतासाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे, कारण एल-निनोचा थेट संबंध भारतीय मान्सून कमकुवत होण्याशी जोडला जातो. भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला असून देशाला दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनचे आगमन वेळेपूर्वी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अंदमान-निकोबार बेटांवर मान्सून दाखल झाला असून केरळमध्येही तो २६ मेच्या आसपास पोहोचण्याचा अंदाज आहे. परंतु, मान्सून लवकर येणे आणि तो समाधानकारक राहणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे मान्सूनच्या वितरणात प्रचंड असमतोल निर्माण झाला आहे. काही भागात अतिवृष्टी तर काही भागात दीर्घ कोरडे अंतर अशी परिस्थिती सातत्याने दिसून येत आहे. एल-निनोचा सर्वाधिक फटका उत्तर, पश्चिम आणि मध्य भारताला बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पंजाब, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्रातील काही भाग यांसारख्या शेतीप्रधान प्रदेशांमध्ये खरीप हंगाम धोक्यात येऊ शकतो. पावसातील घट ही केवळ उत्पादन घटण्यापुरती मर्यादित राहत नाही; तिचा परिणाम रोजगार, पशुधन, ग्रामीण बाजारपेठ आणि अन्नधान्याच्या किमतींवरही होतो. खरीपातील नुकसान रबी हंगामावरही परिणाम करते. पाणीटंचाईमुळे चाराटंचाई निर्माण होते आणि ग्रामीण स्थलांतराची समस्या वाढू शकते. याहून मोठी चिंता म्हणजे बदललेले पावसाचे स्वरूप. पूर्वी चार महिने तुलनेने समतोल स्वरूपात पडणारा पाऊस आता काही दिवसांच्या अतिवृष्टीत केंद्रित होत आहे. जमिनीला पाणी शोषून घेण्यास वेळच मिळत नाही. परिणामी, धरणे भरतात, पूरस्थिती निर्माण होते; पण भूगर्भातील पाणीसाठे वाढत नाहीत. अतिवृष्टी असूनही 'कोरडा दुष्काळ' निर्माण होण्यामागील हेच प्रमुख कारण आहे. हवामान बदलामुळे पावसाचे दिवस कमी आणि तीव्रता अधिक झाली आहे. त्यामुळे केवळ पावसाचे प्रमाण नव्हे, तर त्याचे वितरण हा देखील गंभीर प्रश्न बनला आहे. या पार्श्वभूमीवर शासन आणि प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. जलसंधारण, पाणी पुनर्वापर, सूक्ष्म सिंचन, पिकांचे विविधीकरण आणि हवामानस्नेही शेतीपद्धती या गोष्टी आता पर्याय राहिलेल्या नाहीत, तर त्या अपरिहार्य बनल्या आहेत. धरणांमधील उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन, भूजल पुनर्भरण आणि शेतकऱ्यांना अचूक हवामान माहिती पुरविणे यावर भर द्यावा लागेल. हवामान बदलाच्या नव्या वास्तवात पारंपरिक शेती व्यवस्थापन पुरेसे ठरणार नाही.

एल-निनो ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी तिची वाढती तीव्रता आणि जागतिक तापमानवाढ यांचा संयुक्त परिणाम भविष्यासाठी गंभीर इशारा देत आहे. मान्सूनवरील अवलंबित्व कमी करून जलव्यवस्थापन आणि शाश्वत शेती यांचा मजबूत पाया उभारला नाही, तर देशाला वारंवार दुष्काळ, अन्नटंचाई आणि आर्थिक अस्थिरतेचा सामना करावा लागू शकतो. यंदाचा मान्सून केवळ हवामानाचा विषय नसून तो देशाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याचीही मोठी परीक्षा ठरणार आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची बदनापूर तहसील कार्यालयात आढावा बैठक

### प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे आदेश



**जालना । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजाला गती देण्यासाठी तसेच विविध प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याच्या दृष्टीने आज तहसील कार्यालय, बदनापूर येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीमध्ये तहसीलदार बदनापूर येणे नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तत्काळ निकाली काढावे . नसता संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल अशा सूचना देण्यात आले आहे.. बैठकीत महसूल, निवडणूक, गृहनिर्माण व ग्रामविकासाशी संबंधित विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.**

यावेळी बदनापूर तालुक्यात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. जनगणना काम अचूक व वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच 'सर्वांसाठी घरे' या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेबाबतही चर्चा करण्यात आली. बैठकीत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. मतदार यादी अद्ययावत करणे, पात्र मतदारांची नोंदणी व त्रुटी दूर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे निर्देश देण्यात आले. शासकीय जमिनींवरील अतिक्रमण हटविणे आणि सिलींग जमिनींसंदर्भातील प्रकरणांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. शासकीय जमिनी अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच प्रलंबित सिलींग प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रगतीही बैठकीत तपासण्यात आली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुलभ दळणवळणासाठी पाणंद रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीदरम्यान विविध विभागांच्या प्रलंबित कामकाजाचा आढावा घेत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रशासनातील समन्वय वाढवून नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडविण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बैठकीस तहसीलदार, नायब तहसीलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, गट शिक्षण अधिकारी, सर्व मंडळ अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश; श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित ३०१.५४ कोटींची मान्यता

### वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता नियोजन विभाग राबवणार

### मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी; धनंजय मुंडेंनी मानले आभार



**मुंबई । प्रतिनिधी**

**पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर व परिसराच्या विकासासाठी आखण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित ३०१.५४ कोटी रुपयांची मान्यता आज संपन्न झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत राज्य सरकारने दिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत अधिकृतपणे हे जाहीर केले आहे. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.**

विशेष म्हणजे दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार हयात असताना धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नियोजन विभागाकडे वर्ग करून नियोजन विभागामार्फत राबवण्याची मागणी केली होती, त्या मागणीसही शिखर समितीने मंजुरी दिली असून, आता श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा नियोजन विभागाकडून राबवण्यात येणार आहे. या बैठकीत धनंजय मुंडे यांनी सध्या सुरू असलेल्या व आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या विविध कामांबाबत सविस्तर चर्चा करत आगामी सर्व कामांना एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली, त्यासही सकारात्मक प्रतिक्रिया देण्यात आली. श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा पूर्वी २८६ कोटी रुपयांचा होता, त्यास वाढीव मान्यता दिल्याने धनंजय मुंडे यांनी राज्य सरकारचे विशेष आभार मानले आहेत. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार, मंत्री गणेश नाईक, मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे यांच्या सह वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

## अपुऱ्या झोपेचे शरीरावर विपरीत परिणाम - डॉ.जगदीश टेकाळे



**बीड । प्रतिनिधी**

**सध्याच्या धकाधकीच्या जीवनात उशिरापर्यंत जागणे किंवा अपुरी झोप घेणे ही अत्यंत सामान्य बाब झाली आहे. मात्र झोपेची कमतरता शरीर आणि मनावर अनेक अनपेक्षित परिणाम घडवू शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.**

डोकेदुखी, चिडचिड, सतत थकवा, रात्री वारंवार जाग येणे किंवा अचानक जंक फूड खाण्याची तीव्र इच्छा वाढणे ही सर्व लक्षणे शरीराला पुरेशी झोप मिळत नसल्याची चिन्हे असू शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. झोपेची कमतरता मेंदूच्या कार्यावर थेट परिणाम करते. अनेकदा हार्मोन्समध्ये बदल होऊन भूक वाढते. घ्रेलिन वाढते आणि लेप्टिन कमी होते. त्यामुळे जास्त कॅलरी असलेले पदार्थ खाण्याची इच्छा तीव्र होते. दीर्घकाळ असे चालू राहिल्यास लठ्ठपणा आणि मधुमेहाचा धोका वाढू शकतो. भावनिकदृष्ट्याही झोपेचा संबंध आहे. अपुऱ्या झोपेमुळे माणूस अधिक चिडचिडा, संवेदनशील होऊ शकतो. विचारपूर्वक निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे काही अभ्यासांनुसार, झोप न झालेल्या व्यक्ती दबावाखाली चुकीचे निर्णय घेण्याची किंवा न केलेल्या गोष्टी कबूल करण्याची शक्यता अधिक असते. सकाळी उठल्यावर डोकेदुखी होणे, रात्री वारंवार लघुशंकेला जाणे ही लक्षणे स्लीप ॲप्नियाशी संबंधित असू शकतात. या स्थितीत झोपेत श्वासोच्छ्वास खंडित होतो. त्यामुळे शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि हृदयावर ताण येतो. तज्ज्ञांच्या मते, या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



## शिफा कॉलनीतील पाण्याचा प्रश्न आठ दिवसात सोडविणार-वैजनाथ बोराडे

**मंठा । प्रतिनिधी**

मागील काही वर्षापासून शहरातील शिफा कॉलनीमध्ये कमी दाबाने पाणी येत असल्याच्या तक्रारींची दखल घेऊन या कॉलनीतील पाण्याचा प्रश्न आठ दिवसात सोडविणार असे आश्वासन नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे यांनी शिफावासियांना दिले. शहरातील टोकवाडीरोड लगत असलेल्या शिफा कॉलनीमध्ये साधारणतः २८ ते ३० कुटुंब मागील पंधरा वर्षापासून वास्तव्यास आहेत. या कॉलनीमध्ये असलेल्या जुन्या जलवाहिनीद्वारे कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना प्रत्येक वर्षी पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. या कॉलनीतील पाणी प्रश्न सोडविण्यात यावा अशी मागणी स्थानिक नागरिकांनी नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे यांच्याकडे केली होती. त्या अनुषंगाने सोमवार ता. १८ रोजी नगराध्यक्ष श्री बोराडे यांनी शिफा कॉलनीला भेट देऊन नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले. येत्या आठ दिवसात नवीन जलवाहिनी टाकून पाणी प्रश्न सोडविला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी कॉलनीतील रहिवासी संतोष वीरकर, राजू चव्हाण, मनोहर वीरकर, संतोष वाव्हळे, राजेश मगर, आप्पासाहेब सदावर्ते, राहुल विरकर, सुनील चव्हाण, श्री राठोड, सुनील धोत्रे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

## बंधुप्रेमाचे प्रतीक म्हणजेच श्रीराम कथा ह.भ.प.डॉक्टर केशवदास वैष्णव महाराज



**चौसाळा । प्रतिनिधी**

**मुक्ताईनगर चौसाळा येथे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेमध्ये आज भगवान श्रीरामचंद्र व माता सीता यांच्या स्वयंवराचा मंगलमय सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रभू श्रीराम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्या विवाह प्रसंगाचेही सुंदर वर्णन करण्यात आले.**

या निमित्ताने आयोजित श्रीराम कथेत ह.भ.प. डॉ. केशवदास वैष्णव महाराज आपल्या रसाळ व ओजस्वी वाणीतून श्रीरामकथेचे निरूपण करत आहेत. आजच्या कथेमध्ये भगवान श्रीरामचंद्र व माता सीता यांच्या स्वयंवराचा प्रसंग अत्यंत भावपूर्ण पद्धतीने साकारण्यात आला. रामकथा ही बंधुप्रेम, संस्कार आणि आदर्श जीवन जगण्याचा संदेश देणारी कथा आहे, असे सांगताना महाराजांनी रामायणातील विविध उदाहरणांद्वारे श्रीरामांच्या जीवनातील आदर्श स्पष्ट केले. रामायण मानवाच्या जीवनात प्रेम, आनंद आणि एकतेचा संदेश देणारे असल्याचे त्यांनी सांगितले. ही श्रीराम कथा श्रवण करण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीता स्वयंवर प्रसंगी संपूर्ण सभामंडप भक्तिरसाने व आनंदाने भारावून गेला होता. विवाह सोहळ्यानिमित्त गायक ह.भ.प. सुग्रीव महाराज डाके तसेच तबलावादक ह.भ.प. रामेश्वर महाराज जाधव यांच्या सुरेल वादनातून सादर करण्यात आलेली मंगलाष्टके उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध करून गेली. त्यानंतर सर्व भाविक भक्तांनी फुगड्यांचा आनंद घेत भक्तिमय वातावरणात सीता स्वयंवराचा मंगलमय सोहळा साजरा केला. या आनंदोत्सवात व्यासपीठावर उपस्थित कथा प्रवक्ते केशवदास वैष्णव महाराज यांनीही टाळ्यांच्या गजरात भाविकांसोबत आनंद व्यक्त केला.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या थकीत व्याज परताव्याचा प्रश्न तातडीने सोडवा-डॉ.ज्योती मेटे



**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वावलंबी विनायकराव मेटे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मराठा समाज उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना दिनांक २८ मार्च रोजी निवेदन दिले आहे. बनविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कामकाजातील प्रलंबित प्रश्न आणि थकीत व्याज परताव्याच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती महाराष्ट्र शासनाने निवेदनात म्हटले आहे की, अण्णासाहेब पाटील मराठा समाजातील तरुणांना उद्योग व व्यवसायासाठी प्रोत्साहन देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली. या योजनेमुळे अनेक तरुणांना रोजगाराची संधी मिळून अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून महामंडळाच्या कामकाजात गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

महामंडळाकडून कर्ज घेऊन व्यवसाय सुरू केलेल्या लाभार्थ्यांना मिळणारा नियमित व्याज परतावा अचानक बंद झाल्याने नवउद्योजकांवर बँकांच्या व्याजाचा आर्थिक भार वाढला असून त्यांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच कर्जासाठी अर्ज केल्यानंतर एलओआय (डर्शीशी ष खपींशपीं) मिळण्यासाठी निश्चित कालमर्यादा नसल्याने तरुणांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. अनेकदा किरकोळ तांत्रिक त्रुटी दाखवून व्याज परताव्याचे प्रस्ताव प्रलंबित ठेवले जात असल्याने लाभार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे व्याज परताव्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून प्रशासनाची प्रक्रिया अधिक सुलभव कालमर्यादित पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी डॉ. मेटे यांनी केली आहे मात्र आजतागायत यावर उपाययोजना करण्यात आली नाही त्यामुळे आता डॉ. ज्योती मेटे या मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची भेट घेऊन या संदर्भात तातडीने उपाययोजना करण्यासंदर्भात मागणी करणार आहेत.

## शिवमहापुराण कथा श्रवणाने आत्मिक समाधान आणि आनंदप्राप्ती होते-समाधान महाराज शर्मा

**बीड । प्रतिनिधी**

**भगवान भोलेनाथ शंकराची शिवमहापुराण कथा श्रवण केल्याने मानवी जीवनाचा उद्धार होतो. जीवनाच्या कल्याणासाठी, समाधान आणि आनंददायी जीवन होण्यासाठी शिवआराधना आणि कथाश्रवण करावे, असे प्रतिपादन वाणीभूषण तथा भावरत्न समाधान महाराज शर्मा यांनी केले. गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे श्री शिवमहापुराण कथा सोहळ्याच्या सांगता प्रसंगी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी केले.**

याप्रसंगी कथा निरुपण करतांना समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या मधुरभाव, व्यासंगी चिंतन, आध्यात्मिक दृष्टांतासह सामाजिक आत्मभान करून देणाऱ्या उदाहरणांमुळे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी त्यांनी बारा ज्योतिर्लिंग आणि सविस्तर विवेचन करून केलेल्या उदबोधनामुळे भाविक तल्लीन झाले. आपसातील वाद, मतभेद, बंद करा. प्रेमाने आनंदाने जीवन जगत असताना परोपकार आणि सामाजिक सहकार्याची भावना ठेवावी. कोणाशिवाय कोणाचेही भागात नाही. कर्म चांगले असावे. जीवनात कर्म चांगले केल्यास तेच चांगले कर्म शिल्लक राहते. इंग्रजी शिक्षणाचा अतिरेक होत आहे. मराठी माध्यमातून मुलांना शिक्षण द्यावे. झुक झुक आगनगाडी आदी विविध भावस्पर्शी आणि उदबोधन करणारे मराठीतील गीते आणि अभंगाचे बहारदार सादरीकरण केले. ह भ प समाधान महाराज शर्मा यांचा हृदयस्पर्शी आणि मनाला ठाव घेणारा आवाज, प्रसंगातील पात्रांची हुबेहूब नक्कल, संस्कृत मराठी आणि हिंदी विषयाचा व्यासंग भावी कसरत्याच्या मनावर अधिराज्य करतो. रामायण, महाभारत, यामधील विविध पात्राचा हुबेहूब आवाज आणि उच्च दर्जाची साथसंगत कथा कथा ऐकणाऱ्या भाविकाच्या मनाचा वेध घेते. शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही समाधान महाराज यांच्या शिवमहापुराण कथेला प्रतिष्ठित मान्यवरासह भाविकांची मोठी गर्दी होते

## पान १ वरून...

### एल निनो मुळे खरीप पीक

अहवाल प्रसिद्ध झाला होता. त्यात एल निनोचा प्रभाव राहिलेल्या २००२, २००४ आणि २००९ या तीन वर्षांतील परिस्थितीचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास अहवाल धोरणकर्त्यांना आणि संबंधित इतरांना एल निनो परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन आपत्कालीन उपाययोजना तयार करण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतो. तज्ज्ञांच्या मते, एल निनोमुळे मॉन्सून हंगामात कमी पाऊस पडतो. यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये खरीप उत्पादनात घट होते. आता पुन्हा एल निनोचे सावट असल्याने सरकारने त्यासाठी तयारी अधिक मजबूतपणे करायला हवी.

-------------

### शिवराज मोटेगावकरला ९

कोचिंग सेंटरच्या शिवराज मोटेगावकरला ताब्यात घेतले होते. सोमवारी त्याला दिल्लीतील न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान कोर्टाने आरोपीला नेमकी कधी अटक करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित केला. यावर सीबीआयच्या वकिलांनी सांगितले की, मोटेगावकर याला रविवारी संध्याकाळी ७.१५ वाजता पुण्यातून अटक करण्यात आली. शिवराज मोटेगावकरने नीटची प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांमध्ये फिरवली, असा दावा सीबीआयने कोर्टात केला. या प्रकरणात मोठी साखळी कार्यरत असल्याची शक्यता असून संबंधितांच्या आर्थिक व्यवहारांची लिंक तपासणे आवश्यक असल्याचे सीबीआयने सांगितले. मोटेगावकरला १० दिवसांची सीबीआय कोठडी द्यावी अशी मागणी तपास यंत्रणांच्या वकिलांनी कोर्टात केली होती. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर कोर्टाने शिवराजला ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली.

----------------

### एसटीचा प्रवास महागणार

त्यामुळे एसटीकरीता विशेष सवलत देण्याचा निर्णय झाल्यास आम्ही दरवाढ करणार नाही, मात्र सवलत नाही मिळाली तर दरवाढ करावी लागेल, असे सरनाईक म्हणाले. कॅबिनेट बैठकीत मुख्यमंत्र्यांना याबाबत पत्र देणार आहे. मे महिना होईपर्यंत आम्ही थांबणार आहोत. पुढील १० ते १२ दिवस केंद्र आणि राज्यसरकारने योग्य पुर्तता केली आणि ऑईल कंपनीकडून आधीच्या किंमतीत डिझेल मिळाले तर दरवाढ करणार नाही. इंधनवाढ झाली तर आम्हाला दरवाढ करावी लागेल. ज्या घटकांना सवलती दिल्या आहेत त्या मात्र लागू राहतील, असेही सरनाईक यांनी सांगितले.

---------

### पालघर जिल्ह्यात भीषण

होता की घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ कासा उपजिल्हा रुग्णालयात येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, एकाच वेळी इतक्या जणांचा मृत्यू झाल्याने शोककळा पसरली आहे. पोलिसांकडून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू असून पुढील तपास करण्यात येत आहे. धानीवरी येथे घडलेल्या तीन वाहनांच्या अपघातामध्ये आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून वीस ते पंचवीस गंभीर जखमी असल्याची माहिती पालघरच्या पोलिस अधीक्षक यतीस देशमुख यांनी दिली आहे. खासदार हेमंत सावरा यांनीही घटनास्थळाला भेट दिली असून, याबाबतीत अपघातात जखमींना सर्वोतोपरी मदत केली जाईल, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, या दुर्दैवी घटनेनंतर अपघातस्थळी वऱ्हाडी मंडळींचा आक्रोश मन हेलावून टाकणारा होता, अनेकांनी या अपघातात आपले आप्तेष्ट आणि जवळचे नातेवाईक गमावले आहेत.

----------

### नेकनूरमध्ये हिंदू जन आक्रोश

नाहीत असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. त्याचबरोबर आमदार संग्राम जगताप यांनी बोलताना म्हटले की, जर या झुंडशाहीला धडा शिकवायचा असेल तर तुम्ही सर्वांनी एकत्र येऊन लढले पाहिजे आणि जे तुमच्या विरोधात झुंडशाहीचा वापर करतात त्यांच्यासोबत आर्थिक व्यवहारही टाळले पाहिजेत तरच ते जागेवर येतील असे म्हटले. या मोर्चाची सुरुवात श्रीराम मंदिरापासून करण्यात आली. त्यानंतर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून करण्यात आली. यावेळी तालुक्यामध्ये ज्यांच्यावर अन्याय झाला अशा पीडितांनीही त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा पाढा या कार्यक्रमांमध्ये वाचून दाखवला. या कार्यक्रमासाठी नेकनूरसह पूर्ण बालाघाटावरील आणि जिल्ह्यातीलही लोकांचा मोठा सहभागी यामध्ये पाहायला मिळाला. यावेळी बाहेरगावाहून येणाऱ्या लोकांसाठी संयोजन समितीकडून ५०० पाण्याचे जार व दोन ठिकाणी त्यांच्या नास्त्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सुद्धा लोकांची गर्दी पाहून आमदार महेश लांडगे आणि आमदार संग्राम जगताप यांनी आलेल्या लोकांचे अभिनंदन आणि कौतुक केले.

------------

### रुपाली चाकणकरांना ईडीकडून

केल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, ईडीच्या समन्सनंतर विरोधकांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार टीका सुरू केली आहे.

----------

### राज्यात पुन्हा निवडणुकिचा

किमान ७५ टक्के मतदारसंख्या अस्तित्वात असणे आवश्यक असते. ही अट पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार, २५ मे रोजी अधिकृत अधिसूचना जारी केली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांना १ जूनपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. त्यानंतर २ जून रोजी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारी मागे घेण्यासाठी ४ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. तर २२ जून रोजी मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहेत. या निवडणुकांमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये स्थानिक राजकारण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे. अनेक पक्षांकडून उमेदवारीसाठी हालचाली सुरू होण्याची चिन्हे आधीच दिसू लागली आहेत. विविध पक्षांमध्ये उमेदवारीवरून चुरस वाढण्याची शक्यता आहे.

-------------

## थोडक्यात



### बिंदुसरा नदीपात्र, ओपन स्पेस आणि व्यापारी संकुल अतिक्रमणप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये भेदभाव होत असल्याचा आरोप करत बिंदुसरा व करपरा नदीपात्रातील अतिक्रमणे, ओपन स्पेस गिळंकृत प्रकरणे तसेच व्यापारी संकुलातील बेकायदेशीर बांधकामांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१८ सोमवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विभागीय आयुक्त यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन पाठविण्यात आले. आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, रामधन जमाले, बाजीराव ढाकणे, प्राचार्य. डी. जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे , बाळासाहेब मोरे पाटील, किष्किंधा पांचाळ, सिताबाई भोसले ,सिता दहे, आदी सहभागी झाले होते.

गेल्या दोन-तीन दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत हातावर पोट भरणाऱ्या चहा-नाश्ता चालक, टपरीधारक, फळविक्रेते, फुलहार विक्रेते आणि फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. मात्र दुसरीकडे बिंदुसरा व करपरा नदीपात्रातील पुररेषेच्या आतील अतिक्रमणे, उद्यान व मंदिरांसाठी राखीव असलेल्या ओपन स्पेसवरील बेकायदेशीर बांधकामे तसेच व्यापारी संकुलातील अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

नगरपालिका अधिकारी, नगररचनाकार, भूमी अभिलेख कार्यालयातील काही व्यक्ती आणि भू-माफियांच्या संगनमतातून अनेक जागा गिळंकृत करण्यात आल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. बनावट पीटीआर आणि पीआर कार्ड तयार करून काही जागा स्वतःच्या नावावर करून घेतल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ''कायदा सर्वांसाठी समान असावा. गोरगरीबांवर कारवाई आणि धनदांडग्यांना संरक्षण, हे प्रशासनाचे दुटप्पी धोरण थांबले पाहिजे,'' अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली.

### निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

३६ वी राज्यस्तरीय वरिष्ठ मुले व मुली २७ वी. कनिष्ठ मुले व मुली राज्यस्तरीय सपक टकरा याचे आयोजन नागपूर येथे महाराष्ट्र सपक टकरा असोसिएशन यांच्या वतीने ४ जून ते ७ जून दरम्यान नागपूर येथे होत आहे.

बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी निवड चाचणी व प्रशिक्षण साठी आपली नोंद करावी ही निवड चाचणी शारीरिक शिक्षण महाविद्यालय बीड च्या ग्राउंड वर होणार आहे २०/०५/२०२६. रोजी ४.०० वाजता होणार आहे तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त सपक टकर च्या खेळाडू नी भाग घ्यावे असे आवाहन कनिष्ठ गटाच्या खेळाडूंनी येताना आपले आधार कार्ड व दोन पासपोर्ट साईज फोटो व जन्माचा दाखला घेऊन यावा कनिष्ठ गटासाठी ०१/०१/२००८. चे किंवा त्या पुढचे. मुले व मुली असावे असे आव्हान बीड जिल्हा सेपक टकरा असोसिएशन चे अध्यक्ष ॲड. शेख शफिक सचिव प्राध्यापक डॉक्टर परवेज खान यांनी केलेले आहे. मागील वर्षी प्रमाणे जिल्ह्याचा उत्कृष्ट असा संघ राज्यस्तरीय सेपक टकरा स्पर्धेसाठी पाठविण्यात येईल असे सपक टकरा चे प्रशिक्षक असलम खान यांनी सांगितलेला आहे. तरी जास्तीत जास्त खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन केलेले आहे.

# शेतीसोबत आधुनिक दुग्ध व्यवसायाची जोड दिल्यास आर्थिक भरारी शक्य आ. सुरेश धस

## पशुसंवर्धन व दूध उत्पादन वाढ मार्गदर्शन शिबिरात प्रतिपादन







आष्टी । प्रतिनिधी

''शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करताना अत्याधुनिक पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास शेतकऱ्यांना निश्चितच मोठी आर्थिक भरारी घेता येते. जनावरांचे संगोपन करताना उच्च प्रतीच्या ब्रीडचा वापर केल्यास दूध उत्पादन वाढतेच, शिवाय त्या जनावरांना बाजारात अधिक मूल्य मिळते. त्यामुळे दुग्ध व्यवसायाकडे पारंपरिक नव्हे तर वैज्ञानिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन महाराष्ट्र भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांनी केले.

आष्टी तालुका दूध उत्पादक संघ मर्यादित, आष्टी यांच्या वतीने शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य पशुसंवर्धन व दूध उत्पादन वाढ मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते.

आमदार धस म्हणाले, ''दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ आहे. योग्य पशुखाद्य, दर्जेदार ब्रीड, वैज्ञानिक गोठा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड घातल्यास दूध उत्पादनात मोठी वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. आजच्या स्पर्धात्मक युगात माहिती, तंत्रज्ञान आणि नियोजन यांच्या आधारावरच शेतकरी अधिक सक्षम होऊ शकतो.''

या शिबिरात पंजाब राज्यातील भटिंडा येथील ख्यातनाम पशुखाद्य तज्ज्ञ संदीप सिंग, डेअरी फार्मर व प्रशिक्षक हरप्रीत सिंग तसेच राजहंस दूध संघ, संगमनेरचे चेअरमन व महानंद दूध महासंघाचे माजी अध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी आधुनिक दुग्ध व्यवसायातील विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमात दुग्ध व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या आणि एका वेळेस ३५ लिटरहून अधिक दूध देणाऱ्या गायींचे संगोपन करणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी राजेंद्र चकोर, विक्रमराजे थोरात, विलासराव कवडे, डॉ. प्रमोद पावसे तसेच आष्टी तालुका दूध उत्पादक संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. तालुक्यातील शेकडो शेतकरी, पशुपालक आणि दुग्धव्यवसायिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत संपन्न झालेल्या या शिबिराने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दुग्ध व्यवसायाला नवी दिशा दिली असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा हा उपक्रम ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी महानंदच्या माजी संचालिका प्राजक्ता ताई धस आष्टी दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, व्हाईस चेअरमन अशोक गर्जे, दूध संघाचे संचालक शिवाजी घोलप,गोकुळ कोकणे, दूध संघाचे व्यवस्थापक दाणी मामा, मोहन तात्या झांबरे, माळशिखरे बाप्पू, डॉ संतोष शेळके,आदी यावेळी डॉ जालिंदर वांढरे यांनी सखोल प्रस्ताविक केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माऊली जरांगे यांनी केले शेतकरी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

-------------

## वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या शनि मंदिरात श्री.शनैश्वर जन्मोत्सव पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शनीमंदिर देवस्थान ट्रस्ट च्यावतीने शनिवारी (ता.१६) शनैश्वर जन्मोत्सव पारंपरिक पद्धतीने गुलाल उधळन करत उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी अखंड शिवनाम सप्ताहा बरोबरच विविध सामाजिक, रक्तदान शिबीर, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

येथील वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या शनिमंदिरात अनादी काळापासून दरवर्षी श्री.शनैश्वर जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ४६ वर्षांपासून श्री शनैश्वर जन्मोत्सवानिमित्त अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त धार्मिक कार्यक्रमाबरोबरच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रविवार (दि.१०) ते शनिवार (दि.१७) आठ दिवस किर्तन, भजन, परमरस्य पारायण, रक्तदान शिबीर, विद्यार्थी गुणगौरव, अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गुरुवारी (दि.१४) रक्तदान शिबीरात ३१ महिला व युवकांनी रक्तदानात सहभाग नोंदवला. याच दिवशी विद्यार्थी गुणगौरव सोहळा पार पडला. या सप्ताहात रोज सायंकाळी सहा ते आठ पावले खेळण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. शनिवारी (दि.१६) शनी अमावस्या व श्री. शनैश्वर जयंती निमित्त आचार्य गुरुराज महाराज अहमदपूरकर, शंभुलिंग शिवाचार्य महाराज आंबेजोगाई, सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डा यांच्या आर्शिवचनानंतर सायंकाळी सात वाजून ०४ मिनीटांनी पारंपरिक पद्धतीने गुलाल उधळून करत साजरा करण्यात आल्यानंतर महिलांनी श्री शनी देवाचा पाळणा म्हटल्यावर महाआरती करण्यात आली. यावेळी परळीच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, नगरसेवक सौ.जयश्रीताई मोगरकर, माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तत्पूर्वी साडेचार ते शनैश्वर जन्मोत्सवा पर्यंत गुरुलिंग महाराज फुटके गाढे पिंपळगावकर यांचे किर्तन संपन्न झाले. शनैश्वर जन्मोत्सवा नंतर साडेसात ते रात्री अकरा वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप शनीमंदिर येथे करण्यात आले. विशेषतः महिलांसाठी महाप्रसादाची स्वतंत्र व्यवस्था व महिलांना महिलांनीच प्रसादाचे वाटप केले. या महाप्रसादास पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शनी अमावस्या व शनैश्वर जन्मोत्सव एकाच वेळी तब्बल सोळा वर्षांनंतर दुर्लभ योग जुळून आल्याने सकाळपासूनच श्री शनी देवाच्या दर्शनासाठी शनी भक्तांनी गर्दी केली होती. हजारों भाविकांनी सायंकळ पर्यत दर्शनाचा लाभ घेतला. सर्व कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्तांचा मोठा प्रतिसाद मिळाला.


## पान ६ वरुन...


### माजलगावचे भूमिपुत्र

अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या उपकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे ते सहजपणे फोल्ड करता येते. त्यामुळे वापरण्यास सोपे असून प्रवासादरम्यान कमी जागतिक स्तरावर पोहोचलेल्या या यशामुळे डॉ. शेख सुभान हसन यांच्यावर कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या संशोधन आणि उपकरण निर्मितीत डॉ. शेख सुभान हसन यांच्यासह डॉ. शेख रुखसाना अजीजसाब, डॉ. बाळासाहेब किलचे, डॉ. योगेंद्र कुमार पवार, डॉ. अमरदीप असोलकर, डॉ. मीनाक्षी पाटील आणि डॉ. शुभांगी पाटील यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

### परळी तीर्थक्षेत्र विकासासाठी

ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुण्याचे जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

### सार्वजनिक पैशांची उधळपट्टी

खरेदी-विक्रीपुरते मर्यादित झाल्याचे चित्र दिसून येत असल्याची टीका करण्यात आली. ''उत्तरदायित्व आणि त्याग हे सरकारपासून सुरू झाले पाहिजे'' या तत्त्वावर आधारित महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने ७ कलमी प्रति-आवाहन करण्यात आले.

यामध्ये शासकीय उत्सवांवरील उधळपट्टी थांबवणे, साधेपणाचा अवलंब करणे, लोकप्रतिनिधींनी वेतन व भत्त्यांचा त्याग करणे, भव्य रॅलींवरील खर्च रोखणे, विदेशी दौरे टाळणे, व्हीआयपी संस्कृतीचा अंत करून सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे तसेच एक वर्ष ''भ्रष्टाचारमुक्त वर्ष'' म्हणून घोषित करण्याची मागणी करण्यात आली.

जनतेने सत्ता ही सेवा करण्यासाठी दिली असून प्रधानमंत्री यांच्या आवाहनाचा खरा आदर कृतीतून दिसला पाहिजे, हीच महाराष्ट्रातील जनतेची अपेक्षा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष, बीड, रफिक पठाण जिल्हा उपाध्यक्ष, सय्यद सादिक शहराध्यक्ष, माऊली शिंदे जिल्हा सदस्य, कृष्णा जगताप तालुका अध्यक्ष, आजम खान उपतालुकाध्यक्ष, बाळासाहेब मोरे पाटील संस्थापक अध्यक्ष शिवशाहू विचार मंच, डॉ. गणेश ढवळे, भीमराव कुटे जिल्हाध्यक्ष बामसेफ, प्रवीण आनेराव यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड बायपासला ॲड.राऊत

त्याचे पण काम चालू आहे. याच रोडवर समनापूर कडे जाणारा २० फुटाचा रस्ता आहे, इमामपूर रोड ते छत्रपती संभाजी राजे चौक या स्लिप रोडला जर ६०० मीटर आंतर वाढवले तर शेतकऱ्यांना शेती करण्यास व कोल्हारवाडी, समनापूर, इमामपूर, शिंदे वस्ती या गावांना याचा फायदा होईल. यासाठी वारंवार या संदर्भात पत्र व्यवहार करून सुध्दा यावर लक्ष दिले नाही, म्हणून आज या परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता बीड बायपास वरील संबंधीत जागेवर रस्ता भव्य रोको आंदोलन केले याबाबत मा. प्रकल्प सचांलक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले असून या भव्य रस्ता रोकोस महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत,रामभाऊ शिंदे,वामन लिंबाजी शिंदे, दिगंबर तुलसीराम शिंदे, अंकुश तुळशीराम शिंदे, मच्छिंद्र बाबुराव वाणी, रवींद्र मच्छिंद्र माने, जयदीप पांडुरंग पवार, भगवान लिंबाजी शिंदे,प्रविण पालीमकर, सातीराम ठोले,त्रिंबक कानतोडे, आशोक ठोले,राजाभाऊ ठोले यांच्या सह या परिसरातील अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

### कांद्याने रडविले अन् आल्याने

त्यांच्या या प्रयोगाची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

''कांद्यावर रोटर फिरवला आणि निर्णय आयुष्य बदलून गेला''

''कांदा शेती वारंवार तोट्यात जात होती. उत्पादन खर्चही निघत नव्हता. त्यामुळे अडीच एकरांतील उभ्या कांद्यावर रोटर फिरवून आल्याची लागवड करण्याचा धाडसी निर्णय घेतला. जिद्द, चिकाटी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास शेतीतूनही मोठी आर्थिक प्रगती साधता येते,'' असे प्रगतशील शेतकरी गणेश सोनवणे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श

सोनवणे बंधूंनी दाखवून दिले आहे की, शिक्षण, संशोधन आणि योग्य नियोजन यांच्या आधारे शेती ही केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून आर्थिक समृद्धीकडे नेणारा प्रभावी मार्ग ठरू शकतो. बदलत्या शेती व्यवस्थेत पारंपरिक पिकांबरोबरच बाजारपेठेचा अभ्यास करून पर्यायी पिकांकडे वळल्यास शेतकऱ्यांचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. कडा येथील या दोन उच्चशिक्षित भावंडांच्या यशोगाथेमुळे परिसरातील अनेक तरुण शेतकऱ्यांना नव्या आशा आणि नव्या दिशा मिळत आहेत.

## संत विचाराने मानवता व विकासाची प्रेरणा मिळते- बजरंग सोनवणे





पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग देवालयाचे मठाधिपती महादेवानंदभारती महाराज यांचा अभिष्टचिंतन व वारकरी सन्मान सोहळा शुक्रवार दि.१५ रोजी संध्याकाळी श्री.स्वामी अमृत भारती विद्यालय पिंपळवंडी येथे संपन्न झाला.यावेळी ह.भ.प.कृष्ण चैतन्य महाराज,संतोष भारती महाराज, विष्णू महाराज,शिवाजी येवले महाराज,शिवानंदभारती, परमानंदभारती,नारायण महाराज, दत्ता महाराज बेदरे,राम डोंगर महाराज व अनेक संत मान्यवर उपस्थित होते.यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी सांगितले की, मानवी जीवनात शिक्षणाला मोठे महत्त्व आहे.शाळेमधून अनेक प्रकारचे ज्ञान मिळते परंतु अज्ञानी माणसाला हरी किर्तन,ग्रंथवाचन, श्रवणातून ज्ञान मिळतें.ज्ञानेश्वरी पारायण केल्याने विश्वाचे ज्ञान व समाधान मिळते.या ग्रंथामधून मानवी जीवनात मानव व निसर्गाची परिपूर्ण माहिती आहे.संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम महाराज यांचे विचार आचरणातून मानवाला कोणतेही संकट येणार नाही.राजकारणात येताना अध्यात्मिक ज्ञानाची गरज आहे.ग्रंथवाचन व संत विचारामुळे प्रत्येक गावात व शहरात प्रश्न सोडविण्यासाठी व विकासकामे करण्यासाठी सतत प्रेरणा मिळत असते.प्रत्येक माणसाचे दुःख संपविण्यासाठी व प्रत्येक माणसाला सत्कार्यात घेऊन रोजगार मिळवून देण्यासाठी संत विचारच मदत करीत असतात असे सांगितले. महादेवानंदभारती महाराज यांचे या भागात शिक्षण,जलसंधारण, वृक्षसंवर्धन,निसर्गरक्षण व आदर्श समाज निर्मितीसाठी महान कार्य आहे.त्यांच्या प्रत्येक कामातून देवस्थान गाव व मानव विकासाची प्रेरणा मिळते.मराठवाड्यातील सर्वाधिक वृक्षलागवड बाबांनी केलेली आहे.ती आपल्यासाठी कौतुकाची बाब आहे.या भागाच्या व पाटोदा तालुक्याच्या विकासासाठी आपण सदैव प्रयत्नशील आहोत असे सांगितले.कार्यक्रमास माजी आ. साहेबराव दरेकर,परमेश्वर येवले,युवा नेते भाऊसाहेब भवर,युवराज काशीद,अजय काशीद,माऊली जरांगे,उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे, ॲड.एन.एन. साबळे,विक्रम नेमाने, परमेश्वर सातपुते,रामा उगलमोगले, भूमीकन्या शितल यादव, जिजाबाई काकडे, कुसुम सरोदे,अर्जुन पवार, महादेव घुले, उद्धव पवार,कल्याण काकडे,ज्ञानेश्वर पवार,शिवाजी कोल्हे,अशोक पवार, भाऊसाहेब पवार,सरपंच अण्णा येवले,अशोक जेधे,महेश खेंगरे, दादासाहेब बेद्रे,पंजाब आहेर,शेषराव खरमाटे,दिनकर तांबे,पिंटू तांबे,लवांडे मुकादम,गणेश पवार, भागवत खरमाटे,अंकुश लांबरूड, दिलीप भराटे,उद्धव रहाटे,रमेश पवार,दत्ता जरे,महादेव नाकाडे, कैलास पवार,बाळू पवार,वारकरी शेतकरी,बलुतेदार व परिसरातील गावकरी हजर होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक एम.डी.साबळे, एस.आर.पवार,प्रताप पवार,दिलीप जरे यांनी केले. कार्यक्रमासाठी श्री स्वामी अमृतभारती विद्यालय शिक्षक,बंधू- भगिनी,ईश्वरभारती तरुण मंडळ, ग्रामपंचायत पदाधिकारी व गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

## नगर परिषदेकडून मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला सुरुवात



परळी । प्रतिनिधी

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी साचणे, दुर्गंधी व विविध गैरसोयींचा सामना करावा लागू नये यासाठी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व स्वच्छता सभापती सौ.प्राजक्ताताई श्रीकृष्ण कराड यांच्या निर्देशाने परळी नगर परिषदेच्या वतीने मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला आज (दि.१६) पासून सुरुवात करण्यात आली. यावेळी नगर परिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

परळी वैजनाथ शहरातील नदी, नाले, गटारी आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गांची युद्धपातळीवर स्वच्छता करण्यात येत असून ही मोहीम ३० मेपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन नगर परिषद प्रशासनाने केले आहे. शहरातील विविध भागांत साचलेला गाळ, कचरा व अडथळे हटवून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यावर भर दिला जाणार आहे. पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी टाळण्यासाठी प्रशासनाने आधीच तयारी सुरू केली असून स्वच्छ, सुरक्षित आणि मान्सूनपूर्व आवश्यक सर्व तयारी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम वेगाने सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, शहरातील नागरिकांनीही स्वच्छता मोहिमेत सहकार्य करावे, नाल्यांमध्ये कचरा टाकू नये तसेच परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन नगर परिषदेकडून करण्यात आले आहे.

# परळीतील अत्याधुनिक भाजी मंडई उभारण्यासाठी न.प. पदाधिकाऱ्यांकडून पहाणी

## सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ - बाजीराव भैय्या धर्माधिकारी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी नगर परिषदेच्या गणेशपार भागातील भाजी मंडई इमारत अत्यंत जीर्ण झालेली आहे.ही जीर्ण इमारत पाडून त्या ठिकाणी ना.पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक व सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई इमारतीची उभारणी करण्यात येणार आहे.सर्व सुविधांनी युक्त नवीन भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ करण्याचा प्रयत्न असुन त्यादृष्टीने पहाणी, व्यावसायिक,व्यापारी व शेतकऱ्यांशी संवाद साधल्याची माहिती माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली.

माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व न.प. पदाधिकारी यांनी भाजी मार्केट परिसराला भेट देऊन व्यापारी, आडते व शेतकरी बांधवांशी संवाद साधला. अनेक वर्षांपासून या भाजी मार्केटची इमारत धोकादायक अवस्थेत असून, विशेषतः पावसाळ्यात व्यापारी, शेतकरी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची बाब यावेळी समोर आली. या पार्श्वभूमीवर नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. धोकादायक ठरलेल्या या जुन्या इमारतीच्या पाडकामाची कार्यवाही लवकरच हाती घेण्यात येणार आहे. राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हेंबर महिन्यापासून नव्या भाजी मार्केटच्या बांधकामास प्रारंभ होणार आहे. नवीन बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांसाठी सुसज्ज गाळे, कॅन्टीन, शेतकरी बांधवांसाठी निवारा शेड, आधुनिक शौचालय व्यवस्था, पाण्याची टाकी, अंतर्गत रस्ते, पथदिवे, संरक्षण भिंत यासह विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. परळी शहराच्या व्यापारी व कृषी अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेल्या या बाजारपेठेला नवसंजीवनी देण्याचा नगर परिषदेचा प्रयत्न असून, व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांसाठी सुरक्षित, स्वच्छ व आधुनिक बाजारपेठ उभारण्याचा संकल्प असल्याचे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी स्पष्ट केले. यावेळी न.प. गटनेते वैजनाथ सोळंके, अंगद माळी, नगर अभियंता ढवळे, नगर रचना विभागाचे यम्मलवाड यांच्यासह व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे, खते उपलब्ध करा-संजय शिरसाट

## खरीप हंगाम नियोजन बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा



संभाजीनगर : शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी वेळेवर बियाणे, खते आणि पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले. खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक जल्हा नियोजन सभागृहात पार पडली. यावेळी इमाव कल्याण, दुग्ध विकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, खासदार डॉ. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आ. अंबादास दानवे, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, विधानसभा सदस्य आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, आ. प्रशांत बंब, आ. संजना जाधव, आ. विलास भुमरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या खरीप हंगामाचे नियोजन प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांनी सादर केले. यावेळी लोकप्रतिनिधींनी विविध मुद्दे मांडले. आ. प्रशांत बंब यांनी सांगितले, की बँका शेतकऱ्यांना उद्दिष्टानुसार पीककर्ज वाटप करीत नाहीत. तसेच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणाऱ्या विविध अनुदानांवर होल्ड लावून ती रक्कम कर्ज खात्यात जमा केली जाते. खतांचासाठा आवश्यकतेनुसार करावे. तसेच खतांच्या लिंकिंगचा प्रश्न वरिष्ठ पातळीवर मांडून त्यावर तोडगा काढावा. खा. डॉ. कल्याण काळे म्हणाले, की खतांची विक्री निर्धारित दराने होत आहे का, याची वस्तुनिष्ठ माहिती घ्यावी. खतांचे लिंकिंग थांबविण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात. सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांकडे घरगुती उपलब्ध आहेत. मात्र, त्यांची उगवण क्षमता तपासूनच वापरास प्रोत्साहन द्यावे. आ. रमेश बोरनारे यांनी खतांचे लिंकिंग रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याची सूचना केली. संलग्न जिल्ह्यातील शेतकरीही या जिल्ह्यातून खत खरेदी करतात, ही बाब लक्षात घेऊन खत साठ्याची मागणी नोंदवावी. तसेच नजीकच्या रेल्वे स्थानकावरून खतांच्या रॅक उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. आ. विलास भुमरे यांनी शेतकऱ्यांच्या विविध अनुदानांची रक्कम होल्ड करून ती कर्ज खात्यात जमा करण्याच्या प्रकारावर निर्बंध आणावेत, अशी सूचना केली. आ. अंबादास दानवे म्हणाले, की शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी नव्या हंगामासाठी पीककर्ज घेताना जुने कर्ज फेडल्याशिवाय नवे कर्ज मिळत नाही. त्यामुळे संबंधित शेतकरी कर्जमाफीस पात्र राहील का, याबाबत संभ्रम आहे. तो दूर करावा. तसेच खतांच्या लिंकिंगप्रकरणी वरिष्ठ पातळीवर कारवाई व्हावी आणि सोयाबीन बियाण्यांच्या उपलब्धतेची खातरजमा करावी. खरीप आढावा बैठकीत पालकमंत्री शिरसाट म्हणाले, की कर्जमाफीस पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्याबाबत असलेला संभ्रम दूर करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या आगामी बैठकीत हा विषय मांडण्यात येईल.

# जगातली सर्वात महागडी म्हैस

### ८१ कोटी किंमत, मालकाला फायदा कसा होतो?



आपण प्रत्येक वेळेस शेतकऱ्यांबद्दल आणि त्याच्या शेतीबद्दल बोलत असतो. पण शेतकरी म्हंटले तर पाळीव प्राणी यात आलेच. त्यातही म्हैस आणि शेतकरी यांचे नातेच वेगळे. म्हैशी पाळून तिच्या दुधातून अनेक शेतकरी आर्थिक नफा कमवतात आणि त्याच्या प्रपंचाला हातभार लागतो. पण जगातील सर्वात महागडी म्हैस माहिती आहे का? जगातील सर्वात महाग म्हैस ही दक्षिण आफ्रिकेत आहे. या आफ्रिकन म्हशीचे नाव होरीजोन असून तिची किंमत तब्बल ८१ कोटी आहे. आपल्याकडील सध्या म्हशी बघितल्या तर त्यांच्या शिंगाची लांबी ही ३५ ते ४० इंच असते. पण या आफ्रिकन म्हशीच्या शिंगाची लांबी ५६ इंच इतकी आहे. आपल्यासारख्या सर्वसामान्य शेतकऱ्याला अशा प्रकारची म्हैस पाळणं केवळ अशक्य आहे, याचे कारण म्हणजे या म्हशीचा खुराक या हॉरिजन म्हशीच्या शिंगाच्या साईज वरून ती म्हैस किती मोठी असेल याचा अंदाज आला असेल. मालकाला असा होतो फायदा : या म्हशीची किंमत पाहिली तर या किमतीत तुम्ही खूप काही करू शकता, या म्हशीचे पालनपोषण करणारा शेतकरी दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कमाई करतो. याचे कारण म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या घरात या जनुकाची एक म्हैस हवी असते आणि त्यासाठी या म्हशीचे शुक्राणू जगभरातील शेतकरी आपल्या म्हशीच्या पोटात लावतात. या शुक्राणूंच्या विक्रीच्या माध्यमातूनच या म्हशीचा मालक बक्कळ पैसे कमवताना दिसत आहे. भारतातील महागडी म्हैस कोणती : जगातील सर्वात महागडी म्हैस तर आपण बघितली. आता तुम्हाला भारतातली सर्वात महागडी म्हैस माहिती आहे का? भीम ही भारतातील सर्वात महाग म्हैस आहे. ही म्हैस अरविंद जांगीड यांच्याकडे असून तिची किंमत २४ कोटी रुपये आहे. तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल परंतु, या म्हशीचे वजन सुमारे १५०० किलो एवढे आहे.

# बुरशीभक्षक ढालकीटक कारण व नियंत्रण

विविध पिकांवर आढळून येणाऱ्या रोगांमध्ये भुरी हा रोग नुकसानकारक व नियंत्रणास कठीण मानला जातो. या रोगाच्या व्यवस्थापनासाठी विविध उपाययोजना कराव्या लागतात, त्यामुळे पीक उत्पादनात खर्चात वाढ होते. जैविक कीड नियंत्रणामध्ये ढालकीटकांच्या अनेक प्रजाती मावा, पिठ्या ढेकूण, पांढरी माशी, तुडतुडे इ. किडींचे भक्षण करून नैसर्गिक नियंत्रणामध्ये मदत करतात. मात्र इल्लेईस सिन्क्टा हा ढालकीटक त्यांच्यापेक्षा वेगळा ठरतो. कारण हा कीटक इतर किडींवर उपजीविका न करता, थेट पिकांवरील भुरी रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीवर उपजीविका करतो. पानांवर वाढणारा भुरीचा पांढरा थर, त्यातील बीजाणू आणि मायसेलियम खरवडून खातो. त्यामुळे रोगाची तीव्रता कमी होण्यास मदत होते.

कीटकाचे बुरशीभक्षक वर्तन :काही कीटक अन्नासाठी बुरशीवर अवलंबून असतात; या वर्तनास किडीचे बुरशीभक्षक वर्तन म्हणतात. इल्लेइस सिन्क्टा सारखे कीटक पिकांस अपायकारक असणाऱ्या रोगकारक बुरशी खाऊन तिचा नाश करतात.

हा कीटक कोणत्या रोगकारक बुरशी खातो? : फायलॅक्टिनिया कोरिलिया, पोडोस्फेरा, स्फॅरोथेका, ओइडियम यांसारख्या भुरी रोगास कारणीभूत असणाऱ्या बुरशींवर हा कीटक उपजीविका करतो. या बुरश्या सूर्यफूल, तुती, गाजरघास, चवळी, मिरची, ज्वारी, वांगी, भोपळा, कापूस आणि खरबूज या पिकांवर भुरी रोग निर्माण करतात.

किडीची ओळख : अंडी अवस्था – पांढरट रंगाची अंड्याच्या बाह्य कवच फुटण्याआधी फिकट पिवळा रंगाचे होते. अळी अवस्था – अळी गडद करड्या ते काळसर




रंगाची असून, तिचे शरीर लांबट व चपट्या आकाराचे असते. शरीरावर सूक्ष्म काटेरी उंचवटे असल्यामुळे अळी खडबडीत दिसते. उदरावर नारिंगी किंवा पिवळसर ठिपके आढळतात. डोके स्पष्ट, काळसर व मजबूत असते. अळीची लांबी १.१७ मि.मी. ते ५.९२ मि.मी. व रुंदी ०.२९ मि.मी. ते १.५ मि.मी. असते. कोष अवस्था – कोष अंडाकृती व फिकट पिवळ्या रंगाचा असतो. त्यावर करड्या व काळ्या रंगाच्या खुणा आढळतात. त्याची लांबी सुमारे ४.०५ मि.मी. आणि रुंदी २.०४ मि.मी. इतकी आढळते. प्रौढ अवस्था – प्रौढ कीटक आकाराने लहान, लांबट अंडाकृती व मध्यम फुगवटा असलेली दिसते. लांबी सुमारे ४ ते ४.६८ मि.मी., रुंदी ३.०५ ते ३.६० मि.मी. असते. डोके फिकट पिवळे ते क्रीम रंगाचे असते. डोळ्यांमधील अंतर तुलनेने जास्त असते. प्रोनोटमच्या मागील कडेवर दोन ठळक काळे ठिपके दिसतात, तर त्याचे पुढील व बाजूचे कडे पारदर्शक व किंचित वर वळलेले असतात. पंखावरण तेजस्वी लिंबू (पिवळ्या) रंगाचे असून बाजू पारदर्शक दिसतात. शरीराचा खालचा भाग एकसारखा पिवळसर असतो. शृंगिका लांब व सडपातळ असून शेवटी तीन खंडांचा सैल क्लब दिसतो; अंतिम खंड चपट्या चमच्यासारखा असतो.

जीवनक्रम : मादी कीटक पानांच्या खालच्या व वरच्या पृष्ठभागावर समूहाने १२ ते ४१ अंडी घालते. अंडी उबविण्याचा कालावधी साधारणतः ३ ते ४ दिवसांचा असतो. अळीच्या चार अवस्था (इन्स्टार) असून त्या ११ ते १८ दिवसांत पूर्ण होतात. त्यानंतर अळी पूर्वकोष अवस्थेत प्रवेश करते. पूर्वकोष अवस्था १ ते २ दिवसांची असते, तर कोष अवस्था ४ ते ५ दिवस टिकते. प्रौढ नर कीटक सुमारे १० दिवस, तर मादी कीटक सुमारे १५ दिवस जिवंत राहते.

भक्षण पद्धत : ही कीड आपल्या मजबूत चावणाऱ्या मुखांगांच्या साह्याने पानांवरील भुरी खरवडून खाते. अळी व प्रौढ या दोन्ही अवस्था पानांवर फिरत बुरशीचा थर साफ करतात. ही कीड प्रामुख्याने बुरशीचे बीजाणू, मायसेलियम आणि कॉनिडियोस्पोर्स यांवर उपजीविका करते. त्यामुळे भुरी रोगाच्या नैसर्गिक जैविक नियंत्रणात या किडीची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

ढालकीटकाची भुमिका : हा ढालकीटक नुकसानकारक नसून, उपयुक्त आहे. तो विविध पिकांवरील भुरी रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीवर उपजीविका करून जैविक रोग नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावतो. म्हणून शेतकऱ्यांनी या किटकाची अचूक ओळख करून तिच्या संवर्धनासाठी प्रयत्न करावेत. शेतामध्ये या किडीची उपस्थिती आढळल्यास रासायनिक उपायांऐवजी शक्य तितक्या अ-रासायनिक व समन्वित पद्धतींवर भर देऊन रोग व कीड व्यवस्थापन करावे.

# शेतकऱ्यांनो, अशा प्रकारे करा सीताफळ बहराची तयारी



सीताफळ एक महत्वाचे पीक आहे. ते कोरडवाहू भागातील हलक्या ते मुरमाड जमिनीपासून सर्व प्रकारच्या जमिनीत घेतले जाणारे फळपीक आहे. सीताफळाच्या अधिक उत्पादनाकरिता बहराचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. यामध्ये जून महिन्यात नैसर्गिक बहर येतो. मात्र पाण्याची उपलब्धता असल्यास लवकर म्हणजे उन्हाळाच्या सुरुवातीस बहर धरता येतो. उन्हाळी बहराची फळे जुलै ऑगस्ट दरम्यान काढणीस तयार होऊन चांगला दर मिळू शकतो.

विदर्भ व मराठवाड्यात अवकाळी पाऊस पडल्यामुळे उन्हाळी बहराकरिता काही अंशी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. उलट नियमितपणे नैसर्गिक बहर घेतल्या जाणाऱ्या बागांचा ताण तुटल्यामुळे नवीन फूट येऊन फुलधारणा झालेली आहे. त्यामुळे सीताफळ उत्पादकांमध्ये बहर धरण्याबाबत द्विधा मनःस्थिती दिसत आहे. सध्या तापमानात वाढ होत असून, अनुकूल परिस्थितीअभावी फुलगळ होऊन फळधारणा होणे शक्य होत नाही. त्यामुळे मनात कोणताही संभ्रम न ठेवता, नियमितपणे नैसर्गिक बहराची तयारी करणे इष्ट ठरेल. बहर व्यवस्थापनासाठी पुढील बाबींवर भर द्यावा. बहर धरताना मे महिन्याच्या अखेरीस ते जून महिन्याच्या सुरुवातीस पावसाच्या अंदाजानुसार व सिंचन सुविधेच्या उपलब्धतेनुसार छाटणीची कामे सुरू करावीत. अवकाळी पावसामुळे बागांना नवीन फूट येऊन फुलधारणा झालेली आहे. बागेची छाटणी करताना उर्वरित फांद्यांवरील फूट काढून टाकावी. छाटणी करताना जुन्या, वाळलेल्या फांद्या, अनावश्यक व दाटी करणाऱ्या फांद्या काढून टाकाव्यात. झाडाचा मध्यभाग मोकळा राहील, अशा पद्धतीने छाटणी करावी. कारण झाडाची उत्पादकता ही झाडास मिळणारा सूर्यप्रकाश आणि त्याचे झाडामध्ये पसरणे याच्याशी संबंधित असते. झाडास कमी सूर्यप्रकाश मिळाल्यास फळधारणा कमी प्रमाणात होते. छाटणीनंतर ताबडतोब नवीन फूट फूटण्यापूर्वी झाडांच्या फांद्या आणि खोडावर एक टक्का बोर्डो मिश्रणाची (एक किलो चुना अधिक एक किलो मोरचूद प्रति १०० लिटर पाणी) फवारणी करावी. झाडाची खोडे जमिनीपासून दोन ते अडीच फूटापर्यंत मोकळी करावीत. खोडावर १० टक्के तीव्रतेची बोर्डो पेस्ट लावावी. छाटणीमुळे झाडांची नियंत्रित वाढ होते. झाडावर फळांची संख्या मर्यादित राखता येते. फळे आकाराने मोठी होतात. बहरात निव्वळ पावसाच्या पाण्यावरसुद्धा चांगले उत्पादन मिळते. मात्र पावसाचा खंड पडल्यास जमिनीच्या मगदरानुसार भारी जमिनीत पाच ते सहा व हलक्या जमिनीत ३ ते ४ दिवसांनी संरक्षित पाणी द्यावे. ठिबक सिंचनाच्या नळ्या झाडाच्या घेरालागत अंथरून घ्याव्यात.

शिफारशीप्रमाणे खतमात्रा देऊन पाणी सुरू करावे. पाणी देण्याकरिता ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची ५० ते ७० टक्के बचत होते. बागेतील झाडांना प्रतिझाड ३०-४० किलो शेणखत किंवा ६ किलो गांडूळखत आणि २५० ग्रॅम नत्र, १२५ ग्रॅम स्फुरद व १२५ ग्रॅम पालाश अशी खतमात्रा द्यावी. नत्राची निम्मी मात्रा आणि स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पहिले पाणी देताना द्यावी. बहर धरण्यापूर्वी बागेची स्वच्छता करावी. त्यासाठी बागेत पडलेली पाने-फळे, झाडावर लटकलेली काळी व रोगग्रस्त फळे गोळा करून खड्ड्यामध्ये पुरून टाकावेत. छाटणीनंतर बागेची आडवी उभी हलकी मशागत करून घ्यावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५६ : ब्रिटन देशाने फ्रांस देशाविरुद्ध युद्ध पुकारले.
१७७५ : मेरिकन क्रांती  अमेरिकेने कॅनडाशी व्यापार बंद केला.
१७९२ : न्यू यॉर्क शेरबाजाराची स्थापना.
१८७२ : इंग्रज व मराठे यांच्यातील इतिहासप्रसिध्द सालबाईचा तह झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध  जर्मन फौजांनी बेल्जियममधील ब्रुसेल्स शहराचा ताबा घेतला.
१९१५ : युनायटेड किंग्डमचे सरकार अल्पमतात येउन कोसळले.
१९४९ : भारताचा राष्ट्रकुलामध्ये राहण्याचा निर्णय.
१९८३ : लेबाननमधुन सैन्य काढुन घेण्याच्या करारावर लेबानन, इस्त्रायल आणि अमेरिकेने सह्या केल्या.
१९९० : जागतिक आरोग्य संघटनेने समलैंगिकता मानसोपचार रोगांच्या यादीतून काढून टाकले.
१९९५ : जॅक शिराक फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.
२००४ : अमेरिकेतील पहिला कायदेशीर समलिंगी विवाह झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४९ : देवीची लस शोधून काढणारे संशोधक व डॉक्टर एडवर्ड जेन्नर यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८२३)
१८६५ : मुसलमानी काळापासून ब्रिटिश अमदानीपर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास लिहीणारे इतिहासकार रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचा जन्म. (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९५९)
१८६८ : डॉज मोटर कंपनी चे संस्थापक होरॅस डॉज यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९२०)
१८७८ : मुंबई प्रांताचे पहिले भारतीय राज्यपाल व महाराज हरि सिंह यांच्या कारकिर्दीतील जम्मू-काश्मीर प्रांताचे पंतप्रधान व जोधपुर चे दिवाण कपुरथला राजघराण्याचे राजा हरनाम सिंह यांचे पुत्र महाराजा सिंह यांचा जन्मदिन.
१८८८ : टिच फ्रीमन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५ : भारतीय आसामी इतिहासकार, नाटककार, निबंधकार आणि लघुकथा लेखक नकुलचंद्र भुयान यांचा जन्मदिन.
१९३४ : ऍपल इन्क कंपनी चे सहसंस्थापक रॉनाल्ड वेन यांचा जन्म.
१९४५ : भागवत चंद्रशेखर, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९५१ : गझल गायक पंकज उदास यांचा जन्म.
१९६६ : सद्दाम हुसेन यांचा मुलगा कुसय हुसेन यांचा जन्म. (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९७९ : अभिनेत्री मुक्ता बर्वे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८६ : डीयेर एंड कंपनीची स्थापक जॉन डीयेर यांचे निधन. (जन्म: ७ फेब्रुवारी १८०४)
१९७२ : रघुनाथ कृष्ण फडके, शिल्पकार.
१९९६ : कसोटी क्रिकेटपटू रुसी शेरियर मोदी यांचे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९२४)
२००४ : कमिला तय्यबजी, वकील, समाजसेविका.
२००९ : सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता प्रकाश मेहरा यांचे निधन.
२०१२ : अमेरिकन गायिका डोना समर यांचे निधन. (जन्म: ३१ डिसेंबर १९४८)
२०१४ : द लीला पॅलेस, हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स चे स्थापक सी. पी. कृष्णन नायर यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९२२)

# रुंद वरंबा व सरी पद्धतीमुळे पावसाचे पाणी मुरण्यास होते मदत



यंदा पावसाळा हा कमी प्रमाणात असेल असे म्हटले जाते. असे असताना दुसरीकडे मान्सून लवकरच दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अशात पावसाचे प्रमाण, तीव्रता आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन लागवड रुंद वरंबा सरी पद्धतीने केल्यास फायदेशीर ठरते.

रुंद वरंबा व सरी पद्धतीमुळे पावसाचे पाणी मुरते. यामुळे पिकांना कमी पाणी लागते. मुलस्थानी जलसंवर्धन होऊन त्याचा उभ्या पिकास तसेच पुढील हंगामातील पिकास लाभ होतो. हे तंत्र सोयाबीन, तूर, भुईमूग, ज्वारी, बाजरी, उडीद इत्यादी पिकांच्या टोकण पद्धतीने पेरणीसाठी उपयुक्त आहे. यंत्राच्या सांगाड्यावर दोन्ही बाजूला सरी यंत्र असल्यामुळे पडलेल्या सरींमुळे पाण्याचे संवर्धन आणि निचरा होतो. रुंद वरंबा सरी यंत्रामुळे रुंद वरंबा सरी यंत्राद्वारे केलेल्या पेरणीत व पारंपारिक पद्धतीपेक्षा ओलावा जास्त काळ टिकतो. उत्पादनामध्ये पारंपारिक पद्धतीपेक्षा १५ ते २० टक्क्यांनी वाढ होते. पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा सरीद्वारे निचरा होतो. तसेच योग्य प्रमाणात पडलेल्या पाऊस जमिनीत मुरतो. पेरणीचा वेळ वाचतो. यामुळे हे फायदेशीर आहे. यासाठी टोकण यंत्राच्या साहाय्याने आपण चार ओळीतील एक सरी याप्रमाणे पेरणी करतो. त्यासाठी ट्रॅक्टर चालविण्याच्या विविध पद्धतीचा वापर करता येतो. यंत्राच्या रुंदीनुसार ट्रॅक्टरच्या मागील आणि पुढील दोन चाकातील अंतर मोजून घ्यावे. त्याप्रमाणे त्यात बदल करावा. दोन सऱ्यांमध्ये एक १.२ ते १.५ मीटर रुंदीचा वरंबा तयार होतो. त्यावर टोकण यंत्राच्या साहाय्याने एकाच वेळी खत आणि बियाणे पेरता येते.





# कांदा प्रश्नावर ठाकरेंची शिवसेना आक्रमक

## पहिल्यांदाच समृद्धी महामार्गावर चक्काजाम आंदोलन; हजारो शिवसैनिक रस्त्यावर

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत असताना त्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मोठे चक्काजाम आंदोलन करत शिवसैनिकांनी सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. शिवसेना नेते आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. समृद्धी महामार्गावरील इंटरचेंज क्रमांक १९, जांबरगाव येथे हजारो शिवसैनिकांनी एकत्र येत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

विशेष म्हणजे, समृद्धी महामार्ग रोखून आंदोलन करण्याची ही पहिलीच वेळ असल्याची चर्चा आंदोलनस्थळी होती. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नसल्याने त्यांची अवस्था बिकट झाली आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात कांद्याला अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने थेट रस्त्यावर उतरून सरकारला इशारा



दिला. आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काही काळ वाहतुकीवर परिणाम झाल्याने महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. आंदोलनावेळी अंबादास दानवे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला. कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी जगला तरच राज्याची अर्थव्यवस्था मजबूत राहील. मात्र आज कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असून सरकार फक्त आश्वासनांपुरते मर्यादित राहिले आहे, असे दानवे म्हणाले. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी लढा आणखी तीव्र केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

शिवसेनेने आंदोलनादरम्यान सरकारसमोर अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. नाफेडमार्फत तात्काळ कांदा खरेदी सुरू करावी, कांद्याला किमान दोन हजार रुपये प्रतिक्विंटल हमीभाव द्यावा आणि प्रत्येक क्विंटलमागे पंधराशे रुपयांचे अनुदान जाहीर करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय कांदा निर्यात कायमस्वरूपी खुली ठेवण्याची मागणीही करण्यात आली. खतावरील अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे, कांदा चाळ उभारणीसाठी ७५ टक्के अनुदान द्यावे आणि दर्जेदार कांदा बियाणे अनुदानित दरात उपलब्ध करून द्यावे, अशाही मागण्या शिवसेनेकडून करण्यात आल्या. या आंदोलनामुळे राज्यातील कांदा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सरकार काय भूमिका घेणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. आंदोलनात सहभागी झालेल्या शिवसैनिकांनी शेतकऱ्यांना न्याय मिळाल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही, असा निर्धार व्यक्त केला. समृद्धी महामार्गावर झालेल्या या ऐतिहासिक चक्काजाम आंदोलनामुळे राज्य सरकारवर दबाव वाढल्याचे मानले जात आहे. कांदा उत्पादकांच्या प्रश्नावरून येत्या काळात राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांचे तीन दिवसांपासून नाल्यात ठिय्या आंदोलन

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यातील कंजारा येथील नाल्याचे खोलीकरण करून सरळीकरण करावे या मागणीसाठी शेतकऱ्यांनी मागील तीन दिवसांपासून नाल्यातच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. मृद व जलसंधारण विभागाने या आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांतून तिव्र संताप व्यक्त केला जात आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील पिंपळदरी व कंजारा माळरानावरून मोठ्या नाल्याचा उगम आहे. या नाल्याचे पाणी कंजारा शिवारातून पुढे कयाधू नदीमध्ये जाते. सदरील नाला उथळ व अरुंद असल्याने दरवर्षी थोड्या पावसातही माळरानावरील पाणी नाल्यात येते. मात्र अरुंद नाल्यामुळे पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन मोठे नुकसान होते. मागील काही वर्षापासून परिसरातील सुमारे ६० ते ७० शेतकऱ्यांचे ३०० एकर क्षेत्राचे नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खरीपाच्या पिकावर पाणी सोडावे लागत आहे.

दरम्यान, या नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याचा ठराव ग्रामपंचायत कार्यालयाने सन २०२२ मध्ये मृद व जलसंधारण विभागाकडे दिला होता. मात्र या ठरावाकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यानंतर शेतकऱ्यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये विभागाला निवेदन दिले होते. त्यानंतर या विभागाने तीन किलो मिटर अंतराच्या नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याचे अंदाजपत्रक तयार केले. मात्र या



अंदाजपत्रकाला मान्यताच मिळाली नाही. या प्रकारामुळे संतप्त शेतकरी प्रविण कल्याणकर, डिगांबर कल्याणकर, गणेश कल्याणकर, दत्तराव कल्याणकर, मंचक कल्याणकर, रामेश्वर कल्याणकर, कृष्णा कल्याणकर, मनोज कल्याणकर, सुधाकर कल्याणकर, शेषराव कल्याणकर, संतोष कल्याणकर यांनी ता. १५ मे पासून नाल्यामध्येच ठिया आंदोलन सुरु केले आहे. मागील तीन दिवसांपासून आंदोलन सुरु असतांनाही प्रशासनाचा एकही अधिकारी आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी गेला नाही. या प्रकारामुळे शेतकऱ्यांतून तिव्र संताप व्यक्त होत असून मागणी मान्य झाल्या शिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भुमीका शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी मृद व जलसंधारण विभागाशी संपर्क साधला होता. मात्र नाल्याच्या कामाचे अंदाजपत्रक मार्च पुर्वी झाले असते तर जिल्हा नियोजनमधून निधी देता आला असता असे सांगण्यात आले. मात्र अंदाजपत्रक तयार करण्याचे काम मृद व जलसंधारण विभागाचे आहे. मात्र त्यांच्याकडून चूक मान्य केली जात नाही.

# शिक्षण मंत्रालयाकडून डॉ. संदिप साळवे यांना पोस्ट डॉक्टरेट प्रदान

अंबड। प्रतिनिधी

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, शिक्षण मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या वतीने डॉ.संदिप गोरख साळवे यांना अर्थशास्त्र विषयात पीएच डी. नंतरच्या संशोधनासाठी पोस्ट डॉक्टरेट ही पदवी अधिकृतपणे बहाल करण्यात आली आहे. त्यांच्या अंतिम संशोधन अहवालाला भारत सरकारच्या नवी दिल्ली येथील मुख्य कार्यालयाने मंजुरी दिलेली आहे. डॉ. संदीप गोरख साळवे यांनी हा उच्चस्तरीय संशोधन अभ्यास ''मराठवाडा विभाग अंतर्गत अनुसूचित जाति के छात्र को उच्च शिक्षा लेते समय आनेवाली आर्थिक और सामाजिक समस्याओ का अध्ययन'' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर प्रो. दिलीप अर्जुने यांच्या मार्गदर्शनाखाली दोन वर्षात पूर्ण केला. त्यांच्या या शोधनिबंधामुळे मराठवाड्यातील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणातील आर्थिक व सामाजिक अडचणीवर प्रकाश पडणार आहे. ग्रामीण भागातील एका गुणवंत संशोधकाने राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या या यशामुळे अंबड तालुक्यासह संपूर्ण जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



डॉ.संदीप गोरख साळवे यांना अत्यंत प्रतिष्ठेची पोस्ट डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्याबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री श्री. राजेश टोपे, संस्थेच्या सचिव सौ. मनिषाताई टोपे, ज्येष्ठ नेते माननीय सतीश भाऊ टोपे आणि एडवोकेट संभाजी टोपे यांनी विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या उच्चस्तरीय यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सह प्रशासकीय अधिकारी श्री. राहुल भालेकर, मत्स्योदरी महाविद्यालय अंबड चे प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित, उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर उबाळे, पर्यवेक्षक प्रा. पी . टी. काळे, कार्यालयीन अधीक्षक श्री बंडू कणके, स्टाफ सेक्रेटरी प्रो. राम रौनेकर, डॉ. घोगरे डी. एस., डॉ. दिगंबर भुतेकर, डॉ. प्रशांत तोर, डॉ. पडगलवार सुरेंद्र, प्रा. शरद खोजे, डॉ. संदिप गडेकर डॉ. शिवाजी तोर, डॉ. सूरज पवार, डॉ. काटकर एस. एस., डॉ. सिनकर एस. एन., डॉ. कटारे आर. एस., डॉ. पाथरे आर.एफ., प्रा. राखुंडे डी. बी., प्रा. पैठण., प्रा. कटारे वाय. बी., डॉ. मनिषा गायकवाड., डॉ. रामकिसन बेलनूर, डॉ. सुरेश पाटील, डॉ. कृष्णा नागवे, प्रा. शरद खोजे, डॉ. रत्नाकर हुसे., प्रा. दिलीप जाधव, डॉ. दाते, डॉ. निवारे, डॉ. जितेंद्र वाघुंडे., प्रा. किशोर दखणे, डॉ. एस. एस. नजान, प्रा. आरती पिराने, प्रा. विष्णू दुधे, प्रा. संध्या कौटुंबे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी स्वागत आणि अभिनंदन केले.

# शेतकरी मोर्चावर पोलिसांच्या कारवाई विरोधात शेकापसह मित्रपक्षांच्या वतीने निषेध

## मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची केली निवेदनाद्वारे मागणी

बीड । प्रतिनिधी

मुंबई येथे कोकण विभागातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या कारवाईचा निषेध व्यक्त करत बीड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र प्रतिक्रिया नोंदवण्यात आली आहे. मोर्चादरम्यान प्रमुख नेत्यांना फरफटत नेऊन अटक करण्यात आल्याने लोकशाही मूल्यांवर आघात झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कोकणातील शेतकऱ्यांचे आंबा, काजू व इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्यासाठी योग्य भरपाई, कर्जमाफी व अन्य दिलासा मिळावा या मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. मात्र, शांततापूर्ण व संविधानिक मार्गाने आंदोलन करणाऱ्या शेतकरी व नेत्यांवर पोलिसांनी बळाचा



वापर करून कारवाई केली.

या मोर्चात माजी आमदार भाई जयंत पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेवराव जानकर, खासदार विनायक राऊत तसेच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांचा सहभाग होता. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची घटना संतापजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, राज्यातील शेतकरी आधीच महागाई, नैसर्गिक आपत्ती आणि शासनाच्या धोरणांमुळे आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न हा लोकशाहीला काळिमा फासणारा आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची टीका करण्यात आली. शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड, बीड जिल्हा चिटणीस भाई बापुसाहेब साळुंके पाटील, रासपचे जिल्हा आण्णासाहेब मतकर महिला आघाडी अध्यक्षा किरण डोळस सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे, सारिका गायकवाड, भिमराव कुटे, बाळासाहेब मोरे यांनी कारवाईचा तीव्र निषेध नोंदवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# तुळजापूर पालिकेचे गोडावून फोडून मर्क्युरी दिवे, हायमास्ट चोरांनी लांबवले

## गोडावूनच्या दोन फूट रूंद भिंतीला भगदाड पाडून ३३ हजारांचे विद्युत साहित्य लंपास

तुळजापूर। प्रतिनिधी

दोन फूट रूंद असलेली गोडावूनची जुनी भिंत फोडून त्यातील ३२,८०० रुपयांचे विद्युत साहित्य चोरट्यांनी पळवले. हा प्रकार तुळजापुरात गुरुवारी (दि. १४) सकाळी उघडकीस आला आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऐन वर्दळीचा ठिकाणी चोरी झाल्या ने नागरिकांत खळबळ माजली आहे.

नगरपालिकेचे जुन्या बसस्थानकाचा पाठीमागे पाण्याचा टाकी खाली विद्युत विभागाचे गोडावून आहे. या गोडावूनचा दरवाजाचा जुना दरवाजा व खिडकी मोडून तसेच भिंतीला भगदाड पाडत चोरट्यांनी सोडियम मर्क्युरी (२५० वॅट व १२५ वॅट)-२० नग, सोडियम मर्क्युरी पूर्ण सेट-०८ नग, हायमास्ट चॉक-०६ नग, हायमास्ट सेट-०४ नग असे एकूण ३२,८०० रुपयांचा मुद्देमाल बुधवारी (दि. १३) रात्री लंपास केला. पालिकेचे विद्युत विभागाचे कर्मचारी रमेश साळुंके गुरुवारी (दि. १४) सकाळी नेहमीप्रमाणे गोडावूनमध्ये गेले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पालिकेचे विद्युत विभाग पर्यवेक्षक संजय झाडपिडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरोधात तुळजापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिंत पोखरली अन्? दरवाजाही तोडून केली धाडसी चोरी चोरी करण्यासाठी गोडावूनची दोन फूट रूंद असलेली विटांनी बांधलेली भिंत चोरट्यांनी पोखरली. त्याबरोबरच त्यांनी जुनाट दरवाजाही तोडला आहे. या गोडावूनच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेतलेली दिसत नाही.

# तुळजापुरात गृहगणनेवेळी प्रगणकांचे उत्साहात स्वागत

## गृहगणनेत ५१ प्रगणक सहभागी, नागरिकांनी द्यावी सत्य माहिती

तुळजापूर। प्रतिनिधी

भारतीय जनगणनेचा पहिला टप्पा गृहगणनेला शनिवारी दि. १६ मेपासून प्रारंभ झाला आहे. १४ जूनपर्यंत चालणाऱ्या या गृहगणनेत ५१ प्रगणक सहभागी सहभागी झाले आहेत. इतिहासात पहिल्यांदाच यावेळी डीजीटल जनगणना व गृहगणना करण्यात येणार आहे. दरम्यान गृहगणनेसाठी येणाऱ्या प्रगणकांचे नागरिकांतून उत्साहात स्वागत करण्यात येत आहे. कोरोना महामारीमुळे रखडलेल्या २०२१ च्या जनगणनेस अखेर प्रारंभ झाला आहे. दोन टप्प्यांत होणाऱ्या या जनगणनेत पहिल्या टप्प्यात गृहगणना तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष जनगणना होणार आहे. प्रत्यक्ष गृहगणनेस शनिवार १६ मेपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

शहरातील भवानी रोड, पंढरपूरकर गल्ली, मेन रोड या गट क्र. २९ मधील प्रगणक जयजयराम माने यांचे पंढरपूरकर गल्लीतील रहिवाशांनी स्वागत केले. या राष्ट्रीय कार्याबद्दल सत्कार केला. यावेळी जेष्ठ नागरिक, सुवर्णकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजित नाईक, युवास्पंदन चे अध्यक्ष महेंद्र कावरे, केदार शिंदे, सुनील ठोंबरे, अमोल नाईक, अंकुर नाईक आदींची उपस्थिती होती. जनगणनेसाठी बीएलओ, शिक्षक, कृषी सहाय्यक आदि शासकीय कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेण्यात आले आहे. गृहगणनेमध्ये ३४ प्रश्न विचारले जातील ओटीपी किंवा कागदपत्रे देऊ नयेत गृहगणनेसाठी ३४ प्रश्नांची प्रश्नावली असणार आहे. यामध्ये कुटुंबप्रमुखाच्या जातीच्या उल्लेखासह घराची स्थिती, घराचे स्वरूप, घरातील खोल्यांची संख्या, विवाहितांची संख्या, सायकल, मोटरसायकल, वाहन, पाण्याचा स्त्रोत, सांडपाण्याची व्यवस्था, गॅस कनेक्शन आदि संपूर्ण माहिती साठी ३४ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. १८७२ नंतरची ही आहे १६ वी जनगणना स्वतंत्र भारताच्या इतिहासातील आठवी जनगणना तसेच १८७२ नंतरची १६ वी जनगणना सध्या चालू असून २०२६ मध्ये गृहगणनां तर २०२७ मध्ये जनगणनेस प्रारंभ होणार आहे. दर १० वर्षांनी होणारी जनगणना या वेळी कोरोना महामारीमुळे १६ वर्षांनंतर होत आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १६६/२०२६**

**विद्या भ्र. नारायण कराड व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे.**

अर्जदार १. विद्या भ्र. नारायण कराड, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा.वाई ११ १६७, गोवेर्मेन्ट कॉलनी, मुंबई ४०००५१

२. अंकुश पि. यशवंतराव सानप, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा.सौताडा, ता. पाटोदा, जि. बीड.

विरूध्द गैरअर्जदार :- निरंक.

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गवळणबाई भ्र. अंकुश सानप, रा. सौताडा, ता.पाटोदा, जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी गवळणबाई भ्र. अंकुश सानप यांचा मृत्यु दिनांक २४/०८/२०२५ रोजी सौताडा, ता. पाटोदा, जि.बीड येथे झाला आहे. अर्जदार क.०१ ही मयताची एकुलती एक विवाहीत मुलगी असून अर्जदार क.०२ हे मयताचे पती आहेत. मयतास मुलगा नाही.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गवळणबाई भ्र. अंकुश सानप यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८ माहे मे २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७ जुलै २०२६.

स्वाक्षरित
**क लिपीक**

आदेशावरुन,
स्वाक्षरित
**(सहाय्यक अधिक्षक)**
सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

**तहसीलदार, मामलेतदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अंबड**

**प्रशासकीय इमारत ता अंबड**

**जा.क्र.२०२६/जमा-१/कावी-२४४३**

Email: tahsildarambad@gmail.com

**दुरध्वनी संदेश (०२४८३/२७५०२६)**

**दिनांक १५.०५.२०२६**

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी मौजे मसई येथील गट नं. ६० मधील क्षेत्र दुरुस्तीबाबत. अर्जदार राम सक्रु जाधव रा. मसई ता.अंबड जि. जालना यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १४.०५.२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. संतोष आसाराम दौंड २. भास्कर आसाराम दौंड ३. दिनकर आसाराम दौड रा. मसई ता. अंबड जि. जालना येते वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत मौजे मसई येथील गट नं. ६० मधील क्षेत्र दुरुस्तीबाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात की. आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २८.०५.२०२६ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

स्वाक्षरित
**तहसीलदार अंबड**

# शिवाजी कोण होता?:अंबडमध्ये पुस्तकाचे जाहीर वाचन

## 'शिवसन्मान जनसंवाद'मधून शिवचरित्राची लोकाभिमुख मांडणी

अंबड। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी होत असलेल्या अवमानकारक वक्तव्यांच्या निषेधार्थ तसेच शिवचरित्राचा लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन समाजासमोर मांडण्याच्या उद्देशाने अंबड येथे आयोजित करण्यात आलेला 'शिवसन्मान जनसंवाद' कार्यक्रम उत्साहात पार पडला. शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच, अंबड यांच्या वतीने आयोजित या उपक्रमांतर्गत कॉ. गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे जाहीर वाचन करण्यात आले.

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीचे बिनीचे शिलेदार राहिलेले सुप्रसिद्ध विचारवंत आणि कम्युनिस्ट कार्यकर्ते गोविंद पानसरे यांनी सुमारे ३७ वर्षांपूर्वी 'शिवाजी कोण होता' हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकाच्या शीर्षकावरूनच आक्षेप घेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचा आरोप करत जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर राज्यभरात पुरोगामी चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी 'शिवाजी



कोण होता?' या पुस्तकाचे जाहीर वाचन सुरू केले आहे. गोविंदराव जळगावकर नाट्यगृह येथे झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकातील निवडक परिच्छेदांचे वाचन करून उपस्थितांसमोर इतिहासाचा अभ्यासपूर्ण आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोन मांडला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. मारोती तेगमपुरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध ऐतिहासिक ग्रंथांचा संदर्भ देत शिवरायांचे लोककल्याणकारी, बहुजनवादी आणि स्त्रीसन्मान जपणारे व्यक्तिमत्त्व अधोरेखित केले. कॉ. गोविंद पानसरे यांच्या पुस्तकाचा हेतू महाराजांचा अपमान करणारा नसून त्यांना रयतेचा राजा म्हणून समाजासमोर मांडण्याचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकामध्ये शिवाजी महाराजांचे शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य रयतेचे राजे म्हणून चित्रण करण्यात आले आहे. शिवरायांविषयीचे विचार समजून घेण्यासाठी अभ्यासपूर्ण दृष्टी आणि इतिहासाचे भान आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. संजय खोरे यांनी केले. गेल्या काही वर्षांत शिवरायांच्या ऐतिहासिक प्रतिमेचे विकृतीकरण करण्याचे होत असलेले प्रयत्न चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन धनंजय गुळवणे यांनी केले, तर आभार संजय येळवंते यांनी मानले. कार्यक्रमास विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, महिला, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच, अंबडच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी शेतकरी तरुणांच्या गावागावात बैठका

## महिलाही सरसावल्या, पाण्यासाठी लढण्याचा निर्धार

बीड । प्रतिनिधी

**जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळावे यासाठी लोकलढा आंदोलनातील शेतकर्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर २९ मे रोजी बैलगाडी मोर्चा काढण्याचा एल्गार पुकारला आहे. या मोर्चात शेतकर्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे शेतकरी, तरुण गावोगाव बैठका घेत ग्रामीण भाग पिंजून काढत आहेत.**

शासन नदीजोड प्रकल्पाच्या घोषणा करते, प्रत्यक्षात मात्र हा प्रकल्प कधी होईल, हे सांगता येत नाही. विदर्भात वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाला निधी दिला जातोय, मात्र गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प अद्याप लालफितीत अडकलेला आहे. गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व श्री क्षेत्र भगवान गड ते तालखेडपर्यंत उपकलवा करावा यासाठी सर्वे करण्याचे पत्र जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संभाजीनगर येथील वरिष्ठ अधिकारी यांना दिले आहे. यासाठी लोकलढा आंदोलनातील शेतकरी लोकशाही मार्गाने प्रयत्न करीत आहेत, मात्र शासन याची दखल घेत नाही. यासह कोकणचे जे १६८ टीएमसी पाणी येणार आहे, त्यातही बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हक्काचे पाणी द्यावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. या मागणीसाठी शेतकरी बीड



जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढणार आहेत. या मोर्चात शेतकऱ्यांनी बैलगाडी घेऊन सहभागी व्हावे यासाठी लोकलढा आंदोलनातील समन्वयक, तरुण शेतकरी गावोगाव जाऊन बैठका घेत आहेत.

या बैठकांना शेतकरी, तरुणांसह महिलांचाही मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळत आहे. श्री क्षेत्र भगवान गड. शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील शेतीचा पाण्याविना उन्हाळा झाला आहे. या भागातील शेतीला हक्काचे जायकवाडी धरणाचे पाणी नसल्याने शेतकऱ्यांची पिके जळून जात आहेत. पाण्याअभावी शेतकऱ्यांना केवळ एकच पीक घेता येत आहे, त्यामुळे शेती सातत्याने तोट्यात जात आहे. याचा परिणाम शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा यासह आरोग्य, शिक्षण आदींवर होत आहे. या विषयावर बैठकांमधून जनजागृती करुन शेतकर्यांसह चर्चा केली जात आहे. पाचेगाव, पाडळसिंगी, तळवट बोरगाव, हिरापूर, टाकळगाव, कानडा पिंपळगाव, एरंडगाव, इरगाव आदी गावांमध्ये बैठका झाल्या असून बैलगाडी मोर्चात हिरिरिने सहभाग घेण्याचा निर्धार शेतकरी, तरुणांमधून व्यक्त केला जात आहे.

# वरिष्ठ तंत्रज्ञाला एक हजाराची लाच घेताना पकडले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात लाचखोरांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सौर पंपासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदाराकडून एक हजार रुपयांची लाच मागून स्वीकारणाऱ्या वरिष्ठ तंत्रज्ञाला बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याची कारवाई आज करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

बीड एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, कृष्णा अश्रूबा पाळवदे (वय ३३) हे तेलगाव उपकेंद्र येथे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. तक्रारदार यांचे सौर पंप योजनेसाठी नाव मंजूर झाले होते. त्यासाठी स्थळ पाहणी करून ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या मोबदल्यात आरोपीने एक हजार रुपयांची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने चिंचाळा येथे सापळा रचला. यावेळी आरोपी कृष्णा पाळवदे हे तक्रारदाराकडून एक हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.ही कारवाई बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान कवडे, अंमलदार पांडुरंग काचगुंडे, अनिल शेळके, अविनाश दळवी तसेच चालक गणेश म्हेत्रे यांच्या पथकाने केली.या प्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

# येळतांडा, इरला व तालखेड ग्रामस्थांचा वाद मोहन जगतापाच्या मध्यस्थीने मिटला

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील येळातांड, तालखेड व इरला येथील शेतकऱ्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाईपलाईनच्या प्रश्नावरून निर्माण झालेला वाद दि १८ मे सोमवार रोजी आपसी संवाद, समन्वय आणि सकारात्मक चर्चेतून छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन मोहन जगताप यांच्या मध्यस्थीने मिटवण्यात आला.



तालखेड,इरला या दोन्ही गावांतील शेतकरी बांधवांनी संयम आणि एकोप्याची भूमिका घ्यावी तसेच गावातील वातावरण सलोख्याचे ठेवावे, अशा सूचना यावेळी मोहन जगताप यांनी दोन्ही गावच्या ग्रामस्थांना केल्या.या चर्चेद्वारे सर्वांच्या सहमतीने योग्य तो मार्ग काढण्यात आला असून, भविष्यातही परस्पर सहकार्य आणि एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी मालखेड,इरला व येळतांडा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला.

# पाटोदा तालुक्यातील वाघिरा येथील खडीकरण रस्त्यांच्या कामात भ्रष्टाचार

## ग्रामरोजगार सेवकाकडून मजुरांची बोगस हजेरी ?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वाघिरा येथे सुरू असलेल्या खडीकरण रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अन्यथा पाटोदा पंचायत समितीसमोर आत्मदहन करण्याचा इशारा वाघिरा येथील सजग नागरिक आणि अर्जदार संदीप प्रभाकर बांगर यांनी प्रशासनाला दिला आहे. या संदर्भातील एक लेखी तक्रार त्यांनी बीडचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (झेडपी) आणि पाटोदा पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना सादर केली आहे.चुकीच्या पद्धतीने काम आणि शासनाची फसवणूकतक्रारदाराने दिलेल्या अर्जानुसार, वाघिरा गावामध्ये सध्या सुरू असलेली खडीकरण रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट आणि चुकीच्या पद्धतीने केली जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने:१) शिव रस्ता ते जाधव यांचे शेत खडीकरण (काम कोड: १२३५७८५५४७)२) वाघिरा मेन रस्ता ते शिव रस्ता खडीकरण (काम कोड: १२३५७८६५७०)हे दोन्ही रस्ते प्रत्यक्षात एकच असताना, कागदोपत्री मात्र ते वेगवेगळ्या पद्धतीने दाखवून शासनाच्या निधीची मोठी लाटालोटी आणि फसवणूक केली जात असल्याचा खळबळजनक आरोप अर्जात करण्यात आला आहे.ग्रामरोजगार सेवकाचा कारभार: पासवर्डचा गैरवापर आणि बोगस उपस्थितीया संपूर्ण प्रकरणात ग्रामरोजगार सेवकाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. ग्रामरोजगार सेवकाने आपल्या पदाचा गैरवापर करून मनरेगा यंत्रणेचा गोपनीय पासवर्ड इतर व्यक्तींना दिल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर, प्रत्यक्ष कामावर मजूर उपलब्ध नसताना आणि कोणतेही काम सुरू नसताना, मजुरांची बोगस उपस्थिती (हजेरी) दर्शवून थेट बायोमेट्रिक पद्धतीने किंवा ऑनलाईन प्रणालीद्वारे खोटी हजेरी लावली जात आहे. या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून संबंधित ग्रामरोजगार सेवकाला तातडीने पदावरून बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.मागण्या मान्य न झाल्यास आत्मदहनाचा इशाराअर्जदार संदीप बांगर यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे की, या संपूर्ण प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात यावी. जर या प्रकरणाची योग्य चौकशी झाली नाही, तर आपल्याला आत्मदहन करण्याशिवाय कोणताही पर्याय उरणार नाही. यासाठी त्यांनी पाटोदा पंचायत समिती कार्यालयासमोर आत्मदहन करण्याची परवानगी देखील मागितली आहे.या गंभीर तक्रारीमुळे पाटोदा तालुक्यातील खडीकरण कामांमधील आणि मनरेगांतर्गत होणाऱ्या भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, आता जिल्हा प्रशासन आणि गटविकास अधिकारी यावर काय कारवाई करतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# परळी तीर्थक्षेत्र विकासासाठी ३०० कोटींची तरतूद

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ या तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारने ३०१ कोटी ५४ लाख रुपयांच्या अतिरिक्त आराखड्यास मंजुरी दिली असून आणि हा निधी लवकरच वितरित होणार आहे.

राज्यांतील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तिर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, ॲम्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ◀◀ पान ३ वर

# माजलगावचे भूमिपुत्र डॉ. शेख सुभान हसन यांची जागतिक स्तरावर झेप

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील रहिवासी तथा सध्या छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. शेख सुभान हसन यांनी आपल्या सहकारी संशोधकांच्या टीमसोबत विकसित केलेल्या ''फोल्डेबल मल्टी-सेन्सरी इंटरॅक्टिव्ह लर्निंग असिस्टिव्ह डिव्हाइस सिस्टीम''



या अभिनव उपकरणाला यूके पेटंट कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे.

हे अत्याधुनिक उपकरण विशेषतः दृष्टीहीन, श्रवणदोष असलेल्या तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विकसित करण्यात आले आहे. या उपकरणाच्या माध्यमातून विद्यार्थी पाहणे, ऐकणे आणि स्पर्श करणे या तिन्ही संवेदनांच्या साहाय्याने शिक्षण घेऊ शकतात. विशेष शाळा तसेच विशेष बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी हे उपकरण ◀◀ पान ३ वर

# सार्वजनिक पैशांची उधळपट्टी थांबवून साधेपणाचा स्वीकार करा -आम आदमी पार्टीचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

आज बीडच्या वतीने मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, माननीय खासदार तसेच बीड जिल्ह्यातील सर्व आमदारांना ''सार्वजनिक पैशांची उधळपट्टी थांबवून साधेपणाचा स्वीकार करावा'' या मागणीसंदर्भात निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, प्रधानमंत्री यांनी नुकतेच जनतेला सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे तसेच साधेपणा स्वीकारण्याचे आवाहन केले




आहे. मात्र ''लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण'' अशीच सध्याच्या सत्ताधाऱ्यांची परिस्थिती दिसून येत आहे.

महाराष्ट्रात केंद्र, राज्य तसेच बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची सत्ता असताना जनतेच्या करातून जमा झालेल्या निधीची मोठ्या प्रमाणावर उधळपट्टी होत असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. ''परोपदेशे पांडित्य'' ही भूमिका सर्वसामान्य जनतेला मान्य नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. इतिहास साक्षी आहे की, भारताचे माजी प्रधानमंत्री यांनी देशाला अन्नत्यागाचे आवाहन करण्यापूर्वी स्वतःच्या घरात एक वेळचे जेवण बंद केले होते. ''आधी केले मग सांगितले'' हाच खऱ्या नेतृत्वाचा धर्म असतो, असेही निवेदनात म्हटले आहे. सध्याचे राजकारण भव्य मेळावे, कोट्यवधींच्या जाहिराती, पक्षफोड आणि आमदारांच्या ◀◀ पान ३ वर

# बीड बायपासला ॲड.राऊत यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी केला भव्य रास्ता रोको






बीड । प्रतिनिधी

बीड शहरा लगत असलेल्या बीड बायपास वरील इमामपूररोड येथील सर्विस रोड व स्लिप रोड ६०० मीटर वाढवण्या संदर्भात वारंवार पत्र व्यवहार करूनही काम न झाल्यामुळे बीड बायपासला महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड सुभाष राऊत, रामभाऊ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील या परीसरातील सर्व शेतकरी बांधवानी लोकशाही मार्गाने सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. भव्य रस्ता रोको करण्यात आला.

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ हा अतिशय चांगल्या दर्जाचा रस्ता सन २०१९-२० मध्ये बी.ओ.टी. तत्वावर पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी हा रस्ता करत असतांना जुना सोलापूर-धुळे-मांजरसुंबा येथुन येणारा रस्ता छत्रपती संभाजी राजे चौक ते इमामपूर रोड इथपर्यंत रोडची उंची जास्त आहे व संबंधीत क्षेत्रात रोडच्या दोन्ही बाजुने शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत, त्या रोडची उंची असल्यामुळे शेती करता येत नाही. सध्या इमामपूर रोडला स्लिप रोड व सींस रोड मंजूर असून त्याचे काम चालू आहे, तसेच छत्रपती संभाजी राजे चौक बार्शी रोड येथे पण स्लिप रोड व सर्व्हीस रोड मंजूर असून ◀◀ पान ३ वर

# कांद्याने रडविले अन् आल्याने हसविले; दोन लाखांच्या खर्चात २५ लाखांचे घवघवीत उत्पन्न

## उच्चशिक्षित सोनवणे बंधूंची शेतीत आर्थिक क्रांती



**आष्टी । शरद रेडेकर**

उच्च शिक्षण घेतल्यानंतर नोकरीच्या शोधात भटकण्यापेक्षा स्वतःच्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आर्थिक प्रगती साधता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण आष्टी तालुक्यातील कडा येथील दोन उच्चशिक्षित शेतकरी भावंडांनी घालून दिले आहे. कांदा पिकातून वारंवार होणारा तोटा पाहून अडीच एकरांवरील उभ्या कांद्यावर रोटर फिरवण्याचा धाडसी निर्णय घेत या भावंडांनी आल्याची लागवड केली आणि अवघ्या दहा महिन्यांत तब्बल २५ लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवून परिसरातील शेतकऱ्यांसमोर नवा आदर्श निर्माण केला आहे.

कडा येथील गणेश सोनवणे (एम.एस्सी. ॲग्री) आणि शिवाजी सोनवणे (बी.एस्सी. ॲग्री) ही या प्रगतशील शेतकरी भावंडांची नावे आहेत. शेतीविषयक उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःच्या शेतातच आधुनिक शेतीचा प्रयोग करण्याचा निर्धार केला. पारंपरिक पिकांमधून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने आणि कांदा शेती सतत तोट्यात जात असल्याने त्यांनी पर्यायी व अधिक लाभदायक पिकाचा शोध सुरू केला.

यासाठी त्यांनी , आणि जिल्ह्यांमध्ये जाऊन आले लागवडीचा सखोल अभ्यास केला. बाजारपेठेची मागणी, हवामान, खर्च व उत्पादन यांचा बारकाईने विचार करून त्यांनी आल्याची शेती करण्याचा निर्णय घेतला.

**२७०० किलो बेण्यापासून ४२५ क्विंटल उत्पादन**

सोनवणे बंधूंनी येथून माहिम जातीचे २७०० किलो आल्याचे बेणे खरेदी केले. अडीच एकर क्षेत्रात ७५ बेड तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने लागवड करण्यात आली. ठिबक सिंचनाद्वारे पाण्याचे अचूक व्यवस्थापन, संतुलित खतांचा वापर आणि रोगनियंत्रण यामुळे पिकाची वाढ उत्कृष्ट झाली.

या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे १ लाख ७५ हजार रुपयांचा खर्च आला. मात्र मेहनत, तांत्रिक ज्ञान आणि योग्य व्यवस्थापन यांच्या जोरावर ४०० ते ४२५ क्विंटल इतके भरघोस उत्पादन मिळाले.

**बाजारपेठेत चांगला दर; २५ लाखांचे उत्पन्न**

उत्पादित आलेला माल आणि येथील बाजारपेठेत विक्रीसाठी पाठविण्यात आला. सुमारे ५० रुपये प्रति किलो असा समाधानकारक दर मिळाल्याने या भावंडांच्या हाती जवळपास २५ लाख रुपयांचे घवघवीत उत्पन्न आले. खर्च वजा जाता मोठ्या प्रमाणावर निव्वळ नफा मिळाल्याने ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# इन्शुरन्स क्लेम मंजूर न झाल्याने खासगी रुग्णालयाकडून मृतदेह देण्यास नकार; पुण्यात संतापाची लाट

पुणे । प्रतिनिधी

पुणे: वडिलांनतर घरातील एकुलता एक कमावता मुलगा गमावल्यामुळे संपूर्ण कुटुंब दुःखाच्या डोंगराखाली दबले असतानाच, खासगी रुग्णालयाने इन्शुरन्स क्लेम मंजूर झाला नाही, असे सांगत मृतदेह ताब्यात देण्यास नकार दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दरम्यान, या संपूर्ण वादाबाबत रुग्णालयाची बाजू जाणून घेण्यासाठी रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

रुग्णालयाच्या या असंवेदनशील भूमिकेमुळे संतप्त झालेल्या नातेवाइकांनी प्रशासनाला जाब विचारत रुग्णालयातच तीव संताप व्यक्त



केला. या दुर्दैवी घटनेमुळे खासगी रुग्णालय आणि रुग्णांचे नातेवाईक यांच्यातील समन्वयाचा अभाव आणि प्रशासकीय मनमानी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना स्थानिक नगरसेवक सुहास टिंगरे म्हणाले की, धानोरी येथील मुंजाबावस्तीत राहणाऱ्या एका ३१ वर्षीय तरुणाला उपचारासाठी सकाळी जहांगीर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, दुर्दैवाने रात्री ११ च्या सुमारास उपचारादरम्यान या तरुणाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी नातेवाईकांना सांगितले. तरुणाच्या मृत्यूच्या धक्क्यातून नातेवाईक सावरत नाहीत तोच रुग्णालयाकडून बिलांचा खेळ सुरू झाला. अवघ्या १३ तासांच्या उपचारासाठी रुग्णालयाने तब्बल सव्वातीन लाख रुपयांचे बिल नातेवाईकांच्या हातावर टिकवले. मृत तरुणाचे विमा (इन्शुरन्स) संरक्षण असल्यामुळे नातेवाइकांनी तत्काळ क्लेमची प्रक्रिया सुरू केली. मात्र, विमा क्लेममध्ये काही तांत्रिक त्रुटी निघाल्यामुळे त्या दूर करण्याचे काम रुग्णालयाकडून सुरू होते. विमा मंजुरीच्या या प्रक्रियेत संपूर्ण रात्र निघून गेली. दुसरा दिवस उजाडला तरी रुग्णालय प्रशासनाकडून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यासाठी कोणत्याही हालचाली होत नव्हत्या. ही बाब समजताच नगरसेवक सुहास टिंगरे यांनी रुग्णालयात धाव घेतली.

'विमा क्लेम पूर्ण पास झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात देणार नाही,' अशी आडमुठी भूमिका रुग्णालय प्रशासनाने घेतल्याचे नातेवाईकांनी सांगितले. यावर टिंगरे यांनी प्रशासनाला जाब विचारला असता, रुग्णालयाकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ प्रशासनाने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक सुहास टिंगरे आणि नातेवाईकांनी केली आहे. दरम्यान, या संपूर्ण वादाबाबत रुग्णालयाची बाजू जाणून घेण्यासाठी रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही.

# भोंदूबाबा ऋषिकेश वैद्यचा जामीन फेटाळला

पुणे : देवी शक्तीचा संचार असल्याची बतावणी करत लैंगिक अत्याचार प्रकरणातील भोंदूबाबाचा जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी फेटाळला. या प्रकरणातील गांभीर्य, तथ्य व परिस्थिती लक्षात घेता जामीन फेटाळण्यात आल्याचे आदेशात नमूद आहे.




ऋषिकेश श्रीकांत वैद्य (वय ३९, रा. वसई) असे जामीन फेटाळण्यात आलेल्याचे नाव आहे. ही घटना डिसेंबर २०२३ ते ११ मे २०२५ या कालावधीत घडली. २७ मार्च २०२६ मध्ये हडपसर पोलिसात याबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्यानुसार पोलिसांनी २८ मार्च रोजी त्याला अटक केली. सुरूवातीला पोलीस कोठडी, त्यानंतर तो आता न्यायालयीन कोठडीत आहे. न्यायालयीन कोठडीत असताना वैद्य याने जामिनासाठी अर्ज केला. या अर्जास सरकारी वकील ड. लीना पाठक, फिर्यादीचे वकील ॲड. रोहन नहार यांनी विरोध केला. ॲड. नहार यांना ॲड. ओंकार फडतरे, ॲड. गायत्री पोटवडे आणि ड. चैतन्य अभंग यांनी सहकार्य केले. हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. वैद्य याने धार्मिक गुरू म्हणून असलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेत पीडितेवर बलात्कार केला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू आहे. अद्याप दोषारोपपत्र दाखल झालेले नाही. त्यामुळे आरोपीला जामीन दिल्यास तपासावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याचा जामीन फेटाळण्याची मागणी करण्यात आली. नाशिक येथील कॅप्टन अशोक खरातचे प्रकरण राज्यभर गाजत असतानाच शहरातील हा प्रकार उघडकीस आला होता. महिलेशी समाज माध्यमातून ओळख झाल्यानंतर मी देवाचा भक्त असून, तुला उपासना कशी करायची, हे शिकवितो असे सांगून महिलेला जाळ्यात खेचले. तिच्यावर अत्याचार केल्याचे उघड झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# पत्नीच्या गुप्तांगावर सिड टाकलं, १५ दिवस घरात कोंडलं; पतीकडून क्रौर्याचा कळस

पुणे । प्रतिनिधी

चारित्र्यावर संशय घेत 'फक्त मुलीच होतात, मुलगा होत नाही' या विकृत मानसिकतेतून एका पतीने २४ वर्षीय पत्नीला अमानुष मारहाण करून तिच्या गुप्तांगावर सिड ओतल्याची धक्कादायक घटना उरुळी कांचन (ता. हवेली) येथे उघडकीस आली आहे. क्रौर्याचा कळस म्हणजे या कृत्यानंतर आरोपीने



पीडितेला रुग्णालयात न नेता तब्बल १५ दिवस घरातच डांबून ठेवले होते.

याप्रकरणी पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून उरुळी कांचन पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही धक्कादायक घटना २० एप्रिल रोजी घडली. पीडितेचा पती मद्य पिऊन घरी आला आणि 'तू कामावर जातेस, तुझे बाहेर कोणाशी अनैतिक संबंध आहेत ते सांग,' असे म्हणत त्याने शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर धमकी देत त्याने सिडची बाटली आणून तिच्या गुप्तांगावर ओतले. असह्य वेदनेने महिला जिवाच्या आकांताने ओरडत होती. तिने घराबाहेर पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, नराधमाने घराचा दरवाजा आतून बंद करून तिला पुन्हा लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. पीडितेचा आरडाओरडा ऐकून शेजारी राहणाऱ्या तिच्या जावेने सासू-सासऱ्यांना फोन करून बोलावले. मात्र, तोपर्यंत आरोपीने याबद्दल कोणाला काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देत घरातून पळ काढला. अखेर, ९ मे रोजी शनिवारी पती कामावर गेल्याची संधी साधून पीडितेने आपल्या दोन्ही मुलींना सोबत घेतले आणि थेट माहेर गाठले. तिथे तिने घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितला. या घटनेने हादरलेल्या नातेवाईकांनी तिला उरुळी कांचन पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून पीडितेला तत्काळ उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल केले. उपचार घेतल्यानंतर पीडितेने १५ मे रोजी शुक्रवारी तक्रार दिली. त्यानुसार गुन्हा दाखल केला, अशी माहिती पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी दिली आहे.

## मनीषा मांढरे हिचं अखेर निलंबन, नीट पेपरफुटी प्रकरणी मॉडर्न महाविद्यालयाची मोठी कारवाई

पुणे : नीट पेपर फुटी प्रकरणात अटकेत असलेल्या प्राध्यापिका मनीषा मांढरे हिच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रशासनाकडून मनीषा मांढरेच्या निलंबनाचे आदेश जारी करण्यात आले आहेत. महाविद्यालयाच्या प्रशासकीय बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. मनीषा मांढरेचा नीट पेपरफुटीमध्ये हात असल्याचं समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.


मनीषा मांढरे हिचा नीट पेपरफुटीमध्ये हात असल्याचं समोर आल्यानंतर ती ज्या ठिकाणी प्राध्यापिका म्हणून कार्यरत होती त्या मॉडर्न महाविद्यालयात तातडीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत मनीषा मांढरे हिच्या निलंबनाबाबत चर्चा करण्यात आली. या चर्चेनंतर अखेर मनीषा मांढरेच्या निलंबनाचा निर्णय घेण्यात आला. मनीषा मांढरे ही या महाविद्यालयात प्राणीशास्त्राची प्राध्यापिका होती. मनीषा मांढरे हिच्या संदर्भातली घटना शिक्षण क्षेत्राच्या प्रतिमेला बाधा पोहोचवणारी आहे. त्यामुळे त्यांना निलंबित करण्यात येत असल्याचं पत्र महाविद्यालयाकडून काढण्यात आलं आहे. दरम्यान, मनीषा मांढरे हिला सीबीआयने अटक केली असून तिची चौकशी सुरू आहे. अवघ्या देशाला हादरवरुन सोडणाऱ्या नीट पेपर फुटीच्या गुन्ह्यात महाराष्ट्रातील अनेक जण वेगवेगळ्या पातळीवर गुंतल्याचं समोर आलं आहे. पेपर सेट करणारे प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरेनीच पेपर फोडल्याचं समोर आल्यानंतर आता आरसीसी कोचिंग क्लासचे संचालक शिवराज मोटेगावकरना सीबीआयनं अटक केली आहे. धक्कादायक म्हणजे आरसीसीच्या १०१ प्रश्नांपैकीच बहुतेक प्रश्न नीटच्या परीक्षेत आल्याचं समोर आलंय.

ज्या व्हिडीओमुळे मोटेगावकरभोवती संशयाचं धुकं निर्माण झालं तो व्हिडीओही समोर आला. यानंतर मोटेगावकरांचे आर्थिक व्यवहारसुद्धा ईडीच्या रडारवर आहेत. मोटेगावकरांच्या नावावर असलेल्या संपत्तीबाबत तपशीलवार माहिती घेतली जात आहे. तसंच त्याच्या विविध आर्थिक व्यवहारांची छाननी सुरू आहे. मोटेगावकरकडून नीट चे प्रश्न आणि त्या प्रश्नांची उत्तरे ज्यांना मिळाल्याचा संशय आहे ते विद्यार्थी आणि पालक देखील सीबीआयच्या रडारवर आहेत.

# पवित्र पोर्टल शिक्षक भरतीला गती; ३१ मे पर्यंत जाहिरातींची अंतिम मुदत

पुणे । प्रतिनिधी

शिक्षण आयुक्तालयाने 'पवित्र पोर्टल'द्वारे शिक्षक पदभरतीची प्रक्रिया गतिमान केली आहे. त्यानुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि खासगी शैक्षणिक संस्थांना रिक्त शिक्षक पदांच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी ३१ मे २०२६ पर्यंतचा कालावधी निश्चित करून दिला आहे. शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांनी स्पष्ट आदेश जारी केले आहेत.





माध्यमिक शाळांमधील रिक्तपदांचा आढावा घेतला असून, मे २०२६ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांना विचारात घेऊन ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. नियुक्ती प्राधिकाऱ्यांना रिक्तपदांच्या ८० टक्के मर्यादेत मागणी नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण केली आहे. यामुळे रिक्तपदांची नेमकी संख्या पवित्र पोर्टलवर उपलब्ध होणे सोपे झाले आहे. आता सर्व संबंधित संस्थांनी दिलेल्या मुदतीत जाहिराती प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण आयुक्तालयाने केले आहे. ही भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यातील शाळांमधील शिक्षकांच्या कमतरतेवर बऱ्याच प्रमाणात तोडगा निघण्याची अपेक्षा आहे. विशेषतः ग्रामीण भाग आणि खासगी संस्थांमधील रिक्त जागा भरण्यासाठी ही संधी महत्त्वाची ठरणार आहे.उमेदवारांनी पवित्र पोर्टल नियमित तपासणे आणि अधिकृत जाहिरातींनुसार अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. ३१ मे नंतर कोणत्याही नवीन जाहिराती स्वीकारल्या जाणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. शिक्षण विभागाने वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांना सूचना दिल्या आहेत.

# मोशी जलतरण तलावात ११ वर्षीय मुलीचा पाय अडकला जाळीत

**मोशी । प्रतिनिधी**

यमुनानगर येथील मीनाताई ठाकरे जलतरण तलावात एक धक्कादायक आणि तितकीच चिंताजनक घटना समोर आली आहे. येथे पोहण्यासाठी आलेल्या अर्णवी दारफळे या ११ वर्षीय मुलीचा पाय घसरून तलावाच्या बाजूला असलेल्या सिमेंटच्या चेंबरच्या जाळीत अडकला. चिमुरडीस असह्य वेदना झाल्या. ती जोरजोरात रडू लागली. या घटनेमुळे येथील नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त केला आहे.अखेर उपस्थित नागरिक आणि कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नानंतर तब्बल अर्ध्या तासाने या मुलीचा पाय बाहेर काढण्यात यश आले. मात्र, या दुर्लक्षामुळे सर्व पालकांनी तीव संताप व्यक्त केला.



मिळालेल्या माहितीनुसार, अर्णवी जलतरण तलावाच्या काठावर असताना अचानक तिचा पाय घसरला आणि तो थेट सिमेंटच्या जाळीच्या फटीत गेला. पाय इतका घट्ट अडकला होता की तो सहज काढणे अशक्य झाले होते. शेवटी छनी आणि हातोड्याच्या साहाय्याने ती सिमेंटची जाळी अत्यंत काळजीपूर्वक तोडण्यात आली आणि त्यानंतरच मुलीचा पाय सुखरूप बाहेर काढता आला. या संपूर्ण प्रकारात मुलीच्या पायाला दुखापत झाली असून, तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत.लावाच्या सुरक्षेबाबतचा हा पहिलाच प्रकार नसून, आतापर्यंत अशा स्वरूपाच्या चार घटना येथे घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वारंवार घडणाऱ्या या प्रकारांमुळे लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जलतरण तलावाच्या बाजूला असलेल्या सिमेंटच्या जाळीमधील किंवा चेंबरमधील गॅप जास्त असल्यामुळेच लहान मुलांचे पाय त्यात अडकत आहेत.त्यामुळे हा गॅप तातडीने कमी करावा किंवा मुलांचे पाय अडकणार नाहीत अशा पद्धतीची सुरक्षित पर्यायी व्यवस्था तिथे करावी, अशी आग्राही मागणी आता संतप्त पालकांकडून केली जात आहे. कोणत्याही मोठ्या दुर्घटनेपूर्वी प्रशासनाने जागे व्हावे, असा सूर पालकांमध्ये आहे.

# धावत्या कारमध्ये वकील तरुणीचा विनयभंग

पुणे । प्रतिनिधी

एक धक्कादायक घटना पुन्हा एकदा पुण्यातून समोर आली आहे. पुण्यातील उच्चभ्रू आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरातून एक लाजीरवाणी आणि तेवढीच संतापजनक घटना घडली आहे. एका पंचतारांकित हॉटेलमधून पार्टी करून परतणाऱ्या महिला वकिलाचा धावत्या कारमध्ये विनयभंग करण्यात आला आहे. या प्रकरणी पुणे शहर पोलिसांनी तातडीने कारवाई करत ३ संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. हे प्रकरण समोर येताच सर्वच जण हादरून गेले आहेत.





पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित महिला वकील काल रात्री तिच्या ३ मैत्रिणींसोबत कोरेगाव पार्क येथील एका प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलमध्ये पार्टीसाठी गेली होती. तिथून त्या सर्व जणी दुसऱ्या हॉटेलमध्ये जाण्यासाठी निघाल्या. दरम्यान, पीडित महिलेच्या मैत्रिणी तिथून निघून गेल्या. महिला तिथे एकटीच असल्याचे पाहून २ अनोळखी व्यक्तींनी तिला घरी सोडण्याचा बहाणा केला. तिला विश्वासात घेऊन कारमध्ये बसवले. तिने ही विश्वास ठेवला आणि ती त्या कारमध्ये बसली. रात्री जवळपास ११ वाजण्याच्या सुमारास कार सुरू असताना या दोघांनी धावत्या गाडीतच महिला वकिलाचा विनयभंग केला. या धक्कादायक प्रकारानंतर पीडित महिलेने तात्काळ पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगत तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी वेगाने चक्र फिरवली. या प्रकरणाची माहिती देताना पुणे शहर पोलिसांचे अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील यांनी सांगितले की, महिला वकिलाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत ३ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे पुण्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात महिला सुरक्षित आहेत का? असा गंभीर प्रश्न निर्माण करणारी ही घटना आहे. शिवाय ती कोरेगाव पार्क सारख्या भागात घडली आहे. त्यामुळे ते जास्त गंभीर समजले जाते. कारण पुण्यातील हा भाग सर्वात सुरक्षित समजला जातो. मात्र तिथे ही अशी घटना घडली आहे.

# पुणे विभागाची स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक जाहीर; आचारसंहिता लागू



पुणे । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे.

जाहीर कार्यक्रमानुसार २५ मे २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## उन्हाळ्यातील रक्ताच्या तुटवड्याची उणीव भरुन काढणार सिध्दी फाऊंडेशन

पुणे : सामाजिक बांधिलकी जपत गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजन करणाऱ्या सिध्दी फाऊंडेशनतर्फे यंदा २१ मे रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्यामुळे ही उणीव भरुन काढण्यासाठी सिध्दी फाऊंडेशनने पुढाकार घेतला आहे.या उपक्रमामुळे गेल्या अनेक वर्षांमध्ये विविध रुग्णालये आणि वैद्यकिय केंद्रांना अत्यावश्यक (झींपश छशुी) रक्तपुरवठा होवून असंख्य रुग्णांना जीवनदान मिळाले आहे.यावर्षी वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर रक्तदात्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत शिबीराचे नियोजन करण्यात आले आहे.

रक्तदान प्रक्रियेदरम्यान कोणालाही कोणतीही अडचण निर्माण होवू नये यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

रक्तदान शिबीर येत्या गुरुवारी दि.२१ मे रोजी सॅलीसबरी पार्क येथील महावीर प्रतिष्ठान येथे सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत आयोजित केले आहे. सिध्दी फाऊंडेशनचे संस्थापक मनोज छाजेड आणि अध्यक्ष ललित जैन यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.

तुमच्या एका रक्तदानामुळे एखाद्याच्या आयुष्यात पुन्हा आशेचा सुर्योदय होवू शकतो.असा भावनिक संदेश देत त्यांनी या जीवनदायी उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

समाजहितासाठी सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतूक होत असून, यंदाच्या शिबीरालाही नागरिकांचा प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुण्यातील 'या' भागात कोयता गँगची दहशत; मशिदीच्या इमामवरही केला हल्ला

पुणे: पुण्यातील कोंढवा परिसरात किरकोळ वादातून काही तरुणांनी कोयते फिरवत दहशत माजवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेदरम्यान मशिदीच्या इमामवरही हल्ला करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे परिसरात काही काळ



तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.मात्र,स्थानिक नागरिकांनी संयमाची भूमिका घेत हिंदू-मुस्लीम एकोप्याचे दर्शन घडविले.

घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आहे. भररस्त्यात कोयते फिरवत काही तरुणांनी दहशत निर्माण केल्याने स्थानिक व्यापारी आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच कोंढवा पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. स्थानिक नागरिकांनी या घटनेला कोणताही जातीय रंग न देता शांतता राखण्याचे आवाहन केले.कोंढवा परिसर हा विविध धर्मीय नागरिकांच्या एकोप्यासाठी ओळखला जातो.अनेक वर्षांपासून हिंदू-मुस्लीम बांधव येथे शांततेत आणि सलोख्याने राहत असून काही समाजकंटकांमुळे परिसराची प्रतिमा खराब होऊ नये,अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.मशिदीच्या इमामवर झालेल्या हल्ल्याबद्दल सर्व स्तरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे.धार्मिक स्थळांशी संबंधित व्यक्तींवर हल्ले होणे गंभीर बाब असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई व्हावी,अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता आणि सामाजिक सलोखा कायम राखावा,असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.